दैनिक
सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ७२ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार दि.७ जानेवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
दरेगाव
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोना (धोकेगाव), पुलगाव अवळ, ता. देवळी जि. वर्धा

पालकमंत्रिपदाबाबत दोन दिवसांत निर्णय मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती

महायुतीत तिढा नसल्याचा केला दावा;मोदींची टाचणी इतकीही बरोबरी अशक्य

नागपूर (वृत्तसंस्था)

भाजप-महायुती सरकारमध्ये पालकमंत्रीपदाबाबत कोणताही तिढा नसून, उपमुख्यमंत्री अजित पवार हे परदेशात गेले होते, त्यामुळे चर्चा झाली नाही. पालकमंत्री पदासंदर्भात फार तर दोन दिवसांत निर्णय होईल, असा विश्वास महसूल मंत्री व भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. बावनकुळे यांनी सोमवारी सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यानंतर सद्यस्थिती माध्यमांसमोर सांगितली. विदर्भातील झुडपी जंगलाचा प्रश्न सांगण्यासाठी ही भेट होती. तथापि, काही विषयांवर चर्चा झाली.विदर्भात ८६ हजार हेक्टर झुडपी जंगल जमिनी आहेत. त्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात खटला सुरू आहे. काही झुडपी जंगल जमिनी विभागीय आयुक्तांकडून सोडवण्यासाठीचा अहवाल सादर झाला आहे. या झुडपी जंगल जमिनींवर काही लोकांची घरे आहेत. ती घरे कायदेशीर करून देण्यासाठी मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे, ही घरे कायदेशीर करण्यासंदर्भात लवकरच प्रक्रिया सुरू होणार आहे, असे ते म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले आयुष्य छोट्या चहाच्या दुकानातून सुरू केले. मोठा संघर्ष करून ते पंतप्रधानपदापर्यंत पोहोचले आहेत. नरेंद्र मोदी यांच्या संपूर्ण आयुष्याचा अभ्यास केला, तर उद्धव ठाकरे हे मोदी यांच्याबरोबर टाचणी इतकीही बरोबरी करू शकत नाही. उद्धव ठाकरे यांना समजले पाहिजे, की नरेंद्र मोदीनी त्यांचे संपूर्ण आयुष्य १४० कोटी जनतेसाठी समर्पित केले आहे. त्यांचं समर्पण आणि त्याग हा सूर्यप्रकाशाइतका स्वच्छ आहे, असे ते म्हणाले.अतिविलासी उद्धव ठाकरे मातोश्री-२ मध्ये कसे राहातात, कसा अतिविलास करतात, अडीच वर्षे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी कसा अतिविलास केला, हे सर्व सामना'मध्ये छापून आलं असतं, तर बरं झालं असतं. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी अतिविलासावर बोलू नये. खरं तर केजरीवालांच्या शीशमहल'ला सपोर्ट करण्यासाठी उद्धव ठाकरे हे बोलत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदीवर बोलण्याची उद्धव ठाकरे यांची लायकी नाही. त्यांनी आधी आत्मपरीक्षण केलं पाहिजे आणि मग मोदींवर बोललं पाहिजे, अशी टीका बावनकुळे यांनी केली.

आमदार सुरेश धस यांच्याशी माझे २-३ वेळा बोलणे झाले आहे. धस यांनी कोणतीही गोष्ट जाहीरपणे उघड करण्याऐवजी सरकारकडे मांडली पाहिजे. त्यांच्याशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही चर्चा झाली आहे. सरकारशी संबंधित भूमिका सरकारसमोर आणि पक्षाशी संबंधित भूमिका प्रदेशाध्यक्ष म्हणून माझ्यासमोर मांडली पाहिजे. परंतु, बीड हत्या प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी सगळ्या प्रकारची चौकशी सुरू केली आहे. या प्रकरणातील आरोपींना कठोरातील कठोर शिक्षा होईल, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला.



सर्व विभागांनी समन्वय साधून मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्याचे उत्तम नियोजन करावे-आ.जोरगेवार



चंद्रपूर । प्रतिनिधी

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे १० जानेवारीला चंद्रपूरात आगमन होणार असून, त्यांच्या दौऱ्यासाठी सर्व विभागांनी समन्वय साधून नियोजन करावे, अशा सूचना आमदार किशोर जोरगेवार यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. मा. सा. कन्नमवार शतकोत्तर रौप्य महोत्सव निमित्त आयोजित या दौऱ्यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयातील विस कलमी सभागृहात नियोजन बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत प्रभारी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलिस अधीक्षक सदर्शन मुमक्का, महापालिका आयुक्त विविन पालिवार, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. एस. कुंभार, सहाय्यक पोलिस अधीक्षक रिना जनबंधू, उपविभागीय पोलिस अधिकारी सुधाकर यादव यांच्यासह महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. सूर्यकांत खनके, भाजपा जिल्हाध्यक्ष राहुल पावडे, श्री माता महाकाली महोत्सव समितीचे सचिव अजय जयसवाल आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि चंद्रपूरचे सुपुत्र मा. सा. कन्नमवार यांच्या जयंतीनिमित्त शतकोत्तर रौप्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांचे हे चंद्रपूरात मुख्यमंत्री म्हणून पहिले आगमन असल्याने कार्यकर्त्यांमध्ये विशेष उत्साह आहे. या कार्यक्रमात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. सकाळी ८.३० वाजता लोकनेते कर्मवीर दादासाहेब कन्नमवार यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास माल्यार्पण, ९ वाजता वसंत भवन येथून प्रभातफेरी आणि मोरवा विमानतळावर मुख्यमंत्र्यांचे आगमन यानंतर ते श्री माता महाकाली मंदिरात जाऊन दर्शन घेणार आहेत. प्रियदर्शिनी येथे आयोजित महोत्सवाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे.आ. किशोर जोरगेवार यांनी अधिकाऱ्यांना कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सुरक्षेची उपाययोजना, वाहतूक व्यवस्थापन, कार्यक्रम स्थळी सजावट आणि शिस्तबद्ध आयोजनावर भर देण्याच्या सूचना दिल्या. अंतिम तयारी वेळेत पूर्ण करावी आणि कोणतीही गैरसोय होणार नाही, यासाठी दक्षता घ्यावी, असेही ते म्हणाले. या बैठकीत सुरक्षेच्या दृष्टीने विविध उपाययोजना, कार्यक्रमस्थळावरील सुविधा आणि नागरिकांसाठी आवश्यक नियोजनावरही चर्चा करण्यात आली. आयोजक आणि प्रशासनाच्या समन्वयातून कार्यक्रम भव्य आणि यशस्वी होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

बाबूपेठ रेल्वे उड्डाण पुलाचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आभासी प्रणालीद्वारे लोकार्पण

चंद्रपूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि., महाराष्ट्र शासन आणि रेल्वे मंत्रालयाच्या संयुक्त उपक्रमांतर्गत नागपूरमध्ये राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते बाबूपेठ रेल्वे उड्डाणपूलाचे आभासी प्रणालीद्वारे लोकार्पण करण्यात आले. यावेळी राज्यमंत्री आशिष जयस्वाल, आमदार किशोर जोरगेवार यांची उपस्थिती होती.



बाबूपेठकरांची अतिशय जुनी मागणी असलेला बाबूपेठ उड्डाणपूल रहदारीकरिता सुरू करण्यात आला आहे. मात्र सदर पुलाच्या कामात अनेक अडचणी आल्या. काम शेवटच्या टप्प्यात असताना निधीअभावी रखडले. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी प्रयत्न करत सदर पुलाच्या कामासाठी जवळपास साडेपाच कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला. त्यानंतर सदर पुलाचे काम पूर्ण करण्यात आले. मात्र लोकार्पण अभावी बाबूपेठकरांची प्रतिक्षा पुन्हा लांबेल असे चित्र निर्माण झाले. यावर तोडगा काढत आमदार किशोर जोरगेवार यांनी नागरिकांची अडचण लक्षात घेता सदर उड्डाणपूल रहदारी करिता खुला केला होता.

दरम्यान, महाराष्ट्र रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि., महाराष्ट्र शासन आणि रेल्वे मंत्रालयाच्या संयुक्त उपक्रम प्रकल्पांतर्गत नागपूर, अमरावती, चंद्रपूर, जळगाव, वाशिम, धुळे आणि वर्धा जिल्ह्यांत उभारण्यात आलेल्या सात उड्डाण पुलांचे नागपूर येथील कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आभासी प्रणालीद्वारे लोकार्पण करण्यात आले आहे. यात बाबूपेठ रेल्वे उड्डाणपूलाचे सुद्धा लोकार्पण करण्यात आले आहे.

बीड प्रकरणी राज्यपाल हस्तक्षेप करणार सर्वपक्षीय नेत्यांच्या भेटीनंतर दिले आश्वासन

मुंबई (वृत्तसंस्था)

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आता महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन हस्तक्षेप करणार आहेत. या संदर्भात सर्व पक्षीय नेत्यांच्या वतीने राज्यपालांची भेट घेत त्यांना निवेदन देण्यात आले होते. यावर राज्यपालांनी आपण यासंदर्भात हस्तक्षेप करणार असल्याचे आश्वासन दिले आहे. अशी माहिती संभाजीराजे छत्रपती यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

बीड जिल्ह्यातील आरोपी वाल्मीक कराड याच्यावर कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेण्यात यावा, यासह आपल्या विविध मागण्यासाठी सर्वपक्ष मंडळाने राज्यपाल यांची भेट घेतली. युवराज संभाजीराजे छत्रपती यांच्या नेतृत्वात हे शिष्टमद्धे राज्यपालांना भेटले. या शिष्टमंडळने आपल्या मागण्यांचे निवेदन दिल्यानंतर राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी देखील या संदर्भात हस्तक्षेप करण्याचे आश्वासन या शिष्टमंडळाला दिले असल्याची माहिती संभाजीराजे छत्रपती यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



पर्यावरण रक्षणाचे कार्य स्वतःपासून सुरू करा-आ.सुधीर मुनगंटीवार यांचे आवाहन

मुल येथे राष्ट्रीय पर्यावरण संमेलनाचे आयोजन



मुल । प्रतिनिधी


दररोज एकवीसशे रुपयांचा ऑक्सिजन आपण घेतो. ऐंशी वर्षांचे आयुष्य जगल्यास ६ कोटी १३ लक्ष २० हजार रुपयांचे ऑक्सिजन आपण घेणार. विजेप्रमाणे मीटर लागले नाही. अन्यथा हा ऑक्सिजन आपल्याला महागात पडला असता. त्यामुळे आयुष्यात आपण किमान २० हजार रुपयांची झाडे तरी लावायला हवी. झाडे लावण्याचा संकल्प हेच राष्ट्रीय पर्यावरण संमेलनाचे उद्दिष्ट होय. त्यासाठी पर्यावरण रक्षणाचे कार्य स्वतःपासून सुरू करावे, असे आवाहन राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केले.मुल येथील मा. सां. कन्नमवार सभागृहात राष्ट्रीय पर्यावरण संमेलनाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी आ. सुधीर मुनगंटीवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाला राष्ट्रीय सदस्य सुयोग धस, ज्येष्ठ सिने अभिनेते जयराज नायर, कोकण विभागाचे ब्रँड ॲम्बेसिडर विकास महंते,भाजप महासचिव डॉ. मंगेश गुलवाडे, नंदकिशोर रणदिवे,नम्रता ठेमसकर, दीपक भवर, सचिन वाघ, आसिया रिझवी, सोमनाथ कुताळ, रविंद्र पोटे, सुरेश चोपने, डॉ. अभिलाषा गावतुरे,तेजस्वीना नागोसे यांची उपस्थिती होती. डॉ. प्रीती तोटावर यांच्या 'जंगलातील शिलेदार' या पुस्तकाचे प्रकाशनही यावेळी आ. मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले.

पर्यावरणाचे रक्षण आज आपल्यासमोरील सर्वांत मोठे आव्हान आहे. त्यामुळे प्रत्येकाने या कार्यासाठी योगदान द्यायला हवे, असेही ते म्हणाले. मी वन मंत्री असताना पर्यावरण रक्षण ही एक चळवळ व्हावी, यादृष्टीने प्रयत्न केले. यामुळे २ हजार ५५० स्के. किमीने हरित आच्छादन वाढले. देशात पहिला क्रमांक आपल्याला प्राप्त झाला. चार लिमका बुक रेकॉर्ड आणि दोन गिनीज बूक ऑफ रेकॉर्ड मिळाले. ही जन आंदोलनाची चळवळ आपल्याला पुढे न्यावी लागेल, असे आवाहन आ. मुनगंटीवार यांनी केले. १६, १७, १८ जानेवारी या कालावधीत आपण आंतरराष्ट्रीय पर्यावरण संमेलन चंद्रपूरमध्ये घेत आहोत. अशा संमेलनांमध्ये आपण चर्चा करतो, चिंतन करतो, उद्दिष्ट ठेवतो. परंतु, त्या उद्दिष्टापर्यंत आपण पोहोचलो की नाही यावर आपण कधीही बोलत नाही. तुम्ही केलेल्या ठरावाची पूर्तता होते किंवा नाही, हे देखील तपासले पाहिजे, असे आ. मुनगंटीवार म्हणाले.कर्करोगचे प्रमुख कारण प्रदूषण आहे. मनाचे पर्यावरण जेव्हा बिघडते तेव्हा प्रदूषण निर्माण होते. त्यामुळे अशा अधिवेशनांना मर्यादित न ठेवता यात प्रदूषणाचा देखील विचार करायला हवा. आयोजकांनी केवळ असे एक संमेलन घेऊन थांबायला नको. असे संमेलन वर्षभरात दोनदां तरी घेत राहायला हवे. या भागाचा आमदार म्हणून मी निश्चितच आपल्या सोबत आहे, असा शब्दही आ. मुनगंटीवार यांनी दिला.

बाबा आमटे यांच्या आनंदवनात मित्रमेळावा

८ व ९ फेब्रुवारीला आयोजन





श्रमर्षी बाबा आमटे यांनी इ. स. १९४९ मध्ये महारोगी सेवा समिती काढली. १९५१ मध्ये शासनाकडून महारोगी सेवा समिती या संस्थेस शासनाकडून मान्यता मिळून ५० एकर जमीन मिळाली. ही जागा वरोरा शहरापासून तेव्हा ५ किलोमीटर अंतरावर (आता वरोरा आणि आनंदवन एकच झाले आहे) नागपूर चंद्रपूर महामार्गावर आहे. येथे बाबा आमटे यांनी समाजातील वंचितांसाठी आनंदवन वसवले. या घटनेने बाबा आमटे यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. बाबा आमटे यांना मिळालेल्या या जागेत सुरुवातीला फक्त दोन झोपड्या उभ्या करण्यात आल्या होत्या. त्यापैकी एका झोपडीत आमटे कुटुंबीय व दुसऱ्या झोपडीत कुष्ठरोगी रहात असत. बाबांसोबत सहा कुष्ठरोगी व एक गाय व खिशात ७ रूपये होते. यवतमाळ जिल्ह्यातील हल्ली मारेगाव तालुक्यातील गोरज येथील एका जमीनदाराच्या सुखवस्तू घरात जन्म घेतलेल्या बाबांनी जमीनीची मशागत करणे, विहीर खोदणे यासारखी कष्टकरी कामे बाबांनी स्वतः कुष्ठरोग्यासोबत राहून केलेली आहेत. साधनाताई सुद्धा त्यांच्या या कार्यात एकरूप झाल्या होत्या. पुढे बाबा आमटे यांनी आनंदवनात वार्षिक मित्र मेळाव्याचे आयोजन सुरू केले. त्यांचा उद्देश असा होता की , कुष्ठरोग्यांच्या आयुष्यातील हरवलेला आनंद मिळून ते समाधानी रहावे. आणि समाजातील कुष्ठरोग्यांबाबतचे गैरसमज दूर व्हावेत. मित्रमेळाव्यात सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जात. या कार्यक्रमांत अनेक स्तरातील व्यक्ती, कार्यकर्ते व विद्यार्थी यांचा सहभाग असायचा . आनंदवनातील मित्र मेळावा म्हणजे रंजल्या गांजलेल्या शोषित वंचितांच्या चेहऱ्यावर आनंद पसरविण्याचे काम करायचा. या मेळाव्यात महाराष्ट्रातील अनेक मान्यवर व्यक्तींनी सहभाग घेतला होता. त्यापैकी पं. वसंतराव देशपांडे,कुमार गंधर्व, पु. ल. देशपांडे, श्रीराम लागू ,नाना पाटेकर, गो.नी. दांडेकर, दादा धर्माधिकारी, नरहर कुरंदीकर, राम शेवाळकर अशा अनेक प्रतिभावंत मांदियाळीचा उल्लेख करता येईल. सांस्कृतिक कार्यक्रमातून सामाजिक एकता निर्माण करण्याचा प्रयत्न बाबा आमटे यांचा होता. हा चैतन्यमय सोहळ्याला गत अनेक वर्षापासून आनंदवनवासी व बाबांचे चाहते मुकले होते. यावर्षी आनंदवनाच्या ७५ वी निमित्ताने येत्या ८ व ९ फेब्रुवारीला मित्रमेळा आयोजित करण्यात आला आहे. ही बाबांच्या विचारांशी एकरूप असण्यासाठी उर्जावान मेजवानी असणार आहे.



पब्लिक टॅग

डॉ.यशवंत घुमे
मो.९८२२२३३९१२

७५ वर्षांच्या विलक्षण प्रवासाचे सिंहावलोकन आणि समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी संस्था पुढील २५ वर्षांमध्ये राबवू इच्छित असलेल्या नव्या उपक्रमांचे सादरीकरण करण्याच्या उद्देशाने येत्या ८ आणि ९ फेब्रुवारी रोजी आनंदवन परिवाराच्या वतीने आनंदवनात मित्र मेळावा आयोजित केला असल्याची माहिती वरोरा येथील महारोगी सेवा समितीचे विश्वस्त आणि कार्यवाहक डॉ. विकास आमटे आणि डॉ. प्रकाश आमटे यांनी दिली आहे. कुष्ठग्रस्त बांधवांना न्याय, निरोगी आणि अर्थपूर्ण आयुष्य जगण्याची संधी मिळावी या उद्देशाने बाबा आमटे आणि साधनाताई यांनी १९४९ मध्ये आनंदवनात 'महारोगी सेवा समिती, वरोरा' या स्वयंसेवी संस्थेची स्थापना केली. कुष्ठमुक्त झालेल्या या बांधवांनी स्वतःच्या वेदनांवर विजय तर मिळवलाच, पण अंध, अपंग, कर्णबधिर, अनाथ बेरोजगार, ग्रामीण युवा, निराधार, वृद्ध, परित्यक्ता, अन्यायग्रस्त, आदिवासी, अल्पभूधारक शेतकरी अशा इतर वंचित घटकांना सोबत घेत समर्थ वाटचालही केली.

मित्र मेळाव्याच्या पहिल्या दिवशी ८ फेब्रुवारी रोज शनिवारला सकाळी ९.३० वाजता मेळाव्याचा औपचारिक प्रारंभ होईल. त्या दिवशी त्याग समर्पण स्मारकाचे अनावरण, संस्थेच्या ७५ वर्षांच्या प्रवासाचे चित्ररूप व वस्तुरूप प्रदर्शन, संस्थेच्या नव्या पिढीतील पूर्ण वेळ कार्यकर्त्यांशी संवाद, मराठी नाट्य आणि चित्रपटसृष्टीतील संस्थेच्या स्नेही मंडळींकडून सादर विनोदी नाट्य प्रयोग आणि संस्थेच्या कुष्ठमुक्त दिव्यांग आणि आदिवासी कलाकारांतर्फे विशेष सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले जाईल. रविवारी ९ फेब्रुवारी ही बाबा आमटे यांची पुण्यतिथी आहे. या दिवशी सकाळी ९ वाजता एकमेव सत्र प्रारंभ होईल. या सत्रात 'अनाम कुष्ठरुग्ण बांधवांच्या स्मरणशिले'चे अनावरण, मानव, प्राणी आणि पर्यावरण हक्कांसाठी विशेष प्रतिज्ञेच्या माध्यमातून बाबा आमटेंना अनोखी श्रद्धांजली, संस्थेतील कुष्ठमुक्त – दिव्यांग रहिवासी आणि अतिथींचा कृतज्ञता आदान-प्रदान सोहळा, दिव्यांग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी आणि पर्यावरण संवर्धनासाठी संस्था पुढील २५ वर्षांच्या प्रवासात राबवू इच्छित असलेल्या उपक्रमांचे अतिथींच्या हस्ते उद्घाटन होईल. ज्यातून आनंदवनाला 'आरोग्याची राजधानी', 'शिक्षणाची राजधानी', 'कौशल्य विकासाची राजधानी' आणि 'पर्यावरणाची राजधानी' म्हणून स्थापित करण्याचे बाबा आमटेंचे स्वप्न भविष्यात पूर्णत्वास येऊ शकेल. यावेळी आमंत्रित निवडक अतिथी मनोगत व्यक्त करतील. या सत्राची आणि मित्रमेळाव्याची सांगता दुपारी १ वाजता होईल अशी माहिती डॉ. विकास आमटे आणि डॉ. प्रकाश आमटे यांनी एका पत्रकाद्वारे कळविले आहे.

अकोले ग्रामीण रुग्णालयात ८ ते ११ जानेवारी दरम्यान सर्वरोग निदान शिबिराचे आयोजन

अकोले । प्रतिनिधी



राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या अंतर्गत अकोले ग्रामीण रुग्णालयात आदिवासी भागातील नागरिकांना आरोग्य सेवेचा लाभ मिळावा यासाठी ८ ते ११ जानेवारी या कालावधीत मोफत सर्वरोग निदान, उपचार व दंतरोग शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन ८ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सीताराम गायकर असतील.

या कार्यक्रमाला भाजपाचे माजी जिल्हा परिषद सदस्य जालिंदर वाकचौरे, डॉ. स्वप्नील लाळे (संचालक, महाराष्ट्र आरोग्य सेवा), डॉ. कपिल आहेर (उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक परिमंडळ), डॉ. नागोराव चव्हाण (जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, अहिल्यानगर), डॉ. बापूसाहेब नागरगोजे (जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर), तहसीलदार सिद्धार्थकुमार मोरे, डॉ. ए.टी. माने (बीडीओ, पंचायत समिती अकोले), डॉ. शिवशंकर लांडे (अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक, अहिल्यानगर), डॉ. बाळासाहेब मेहेत्रे (वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय अकोले), डॉ. श्यामकांत शेटे (तालुका आरोग्य अधिकारी, अकोले), तसेच इतर वैद्यकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या शिबिरामध्ये लहान व मोठ्या शस्त्रक्रिया, दंतरोग उपचार, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया तसेच विविध आजारांवरील तपासणी व उपचार मोफत केले जाणार आहेत. शिबिरामध्ये सहभागी होणाऱ्या रुग्णांना मोफत सेवा मिळणार असून, अकोले तालुक्यातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाळासाहेब मेहेत्रे यांनी केले आहे.हे शिबिर ८ ते ११ जानेवारी दरम्यान अकोले ग्रामीण रुग्णालयात होणार आहे. नागरिकांनी या चार दिवसीय शिबिराचा लाभ घेण्यासाठी उपस्थित राहावे.

सामान्य जनता हिच माझी ताकद-खा.वाकचौरे

कोपरगाव । प्रशांत टेके पाटील



शिर्डी लोकसभा मतदार संघातील तमाम जनतेच्या वतीने ४ जानेवारी रोजी लोकनेते खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांचा अभिष्टचिंतन सोहळा शिर्डी येथील हॉटेल साईसंगममधील प्रशस्त हॉलमध्ये मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. दुपारी १२ ते ५ वाजेपर्यंत अक्षरशः जनसागर उसळला होता. यावेळी खासदार वाकचौरे यांनी सामान्य जनतेचाच माझी ताकद असून, शेवटच्या श्वासापर्यंत जनतेची सेवा करत राहणार असल्याचे उदगार काढले.

सर्वप्रथम उपस्थित संत-महंतांच्या आशीर्वादाने औक्षण करत, सर्व कुटुंबियांसमवेत खा. वाकचौरे यांना केक कापून आणि ५१ फूट लांब गुलाबाचा हार टाकून अभिष्टचिंतन सोहळ्याची सुरुवात करण्यात आली. यानंतर उपस्थित सर्व शिवसैनिक, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि जनतेच्या वतीने शुभेच्छा स्वीकारण्यात आल्या.

यावेळी खा. भाऊसाहेब वाकचौरे प्रतिष्ठानच्या वतीने सर्वांसाठी सुरुची भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. आपला माणूस आपल्यासाठी हे ब्रीद घेऊन १५ वर्षांपूर्वी सुरु केलेला प्रवास आजही अखंडित सुरू आहे. खा. वाकचौरे यांचा जनसंपर्क कसा आहे आणि लोकप्रतिनिधी कसा असावा याची प्रचिती आजच्या कार्यक्रमावरून अधोरेखित होत होती.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी युवा नेते रोहित वाकचौरे, शिवसेनेचे मुकुंद सिनगर, संगमनेरचे भाऊ वाकचौरे, राहात्याचे मिनीनाथ शिंदे, कोपरगावचे अशोक पवार, श्रीरामपूरचे सदाशिव पटारे, नेवासाचे काळू हाटकर यांच्यासह खा. वाकचौरे प्रतिष्ठानचे सर्व सदस्य उपस्थित होते. खा. वाकचौरे यांचे कार्यालयीन प्रमुख गोपाळ सपकार, जनसंपर्कप्रमुख जयराम कदम, स्वीय सहाय्यक बापूसाहेब यादव, बाळासाहेब सोनवणे, किशोर सोनवणे आदींनी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मेहनत घेतली. सूत्रसंचालन बाळासाहेब सोनवणे यांनी केले, तर मुकुंद सिनगर यांनी सर्वांचे आभार मानले.

देवराव बिपटे यांचे निधन



वर्धा । प्रतिनिधी

देवराव पांडुरंगची बिपटे सेवा निवृत वेकोली कामगार राहणार आनंदनगर पांडव वार्ड भद्रावती वय ६९ वर्ष यांचे आज दिनांक . ६- १- २०२५ रोज सोमवारला पहाटे चार वाजता दरम्यान एका अल्पशा आजाराने वर्धा येथील सावंगी मेघे रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यांच्या पार्थीवावर भद्रावती येथील पिंडोनी स्मशान भुमीत अंत्य संस्कार करण्यात आले . त्याच्या मागे पत्नी एक मुलगी दोन मुले, सुना व नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

जि.प.अंतर्गत आयोजित हिवाळी क्रीडा स्पर्धेत सिद्धार्थ नगर शाळेचा दबदबा



अहिल्यानगर । प्रतिनिधी

जिल्हा परिषद अंतर्गत आयोजित हिवाळी क्रीडा स्पर्धांमध्ये सिद्धार्थनगर शाळेने उल्लेखनीय कामगिरी करत विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केले. श्रीगोंदा येथील ज्ञानदीप शिक्षण संस्थेच्या माध्यमिक विद्यालयात झालेल्या या स्पर्धांमध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांनी अनेक बक्षिसे पटकावली.

मुलींच्या मोठ्या गटातील कबड्डी आणि खो-खो संघांनी प्रथम क्रमांक मिळवला, तर मुलांच्या मोठ्या गटातील कबड्डी संघानेही प्रथम क्रमांक पटकावला. थाळी फेक स्पर्धेत ऋषी सचिन वायदंडे याने १६ मीटर थाळी फेकत प्रथम क्रमांक मिळवला. सम्राट पप्पू घोडके याने लांब उडी व उंच उडीमध्ये प्रथम क्रमांक मिळवला, तर राखी अमोल घोडके हिने उंच उडीमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. लहान गटातील मुला-मुलींच्या कबड्डी व खो-खो संघांनी द्वितीय क्रमांक मिळवला. तालुकास्तरीय सांस्कृतिक स्पर्धांमध्ये समूहगीत गायनात मोठ्या गटातील मुलींनी तृतीय क्रमांक मिळवला. विद्यार्थ्यांच्या या यशामध्ये मुख्याध्यापक संदीप मोटे आणि सहशिक्षक संतोष खंडागळे, संतोष सोनवणे, शारदा शेळके, वर्षा घालमे, ज्योत्स्ना खंडागळे, मंगल जाचक आदी शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले.

कुकडी-घोड प्रकल्पातून चार आवर्तनांचा निर्णय



अहिल्यानगर । प्रतिनिधी

कुकडी आणि घोड प्रकल्पातून प्रत्येकी चार आवर्तन देण्याचा निर्णय राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला.

कुकडी प्रकल्पासाठी सध्या सुरू असलेले रब्बी आवर्तन क्रमांक १ गृहीत धरून एकूण चार आवर्तन आणि घोड प्रकल्पासाठी सध्या सुरू असलेले आवर्तन क्रमांक १ गृहीत धरून एकूण चार आवर्तन देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. दुसऱ्या आवर्तनासाठी पाणी २० फेब्रुवारीपासून सोडले जाईल. उन्हाळी आवर्तनाबाबत पाणीसाठा आणि टंचाईची परिस्थिती पाहून निर्णय घेतला जाईल. बैठकीत पाटबंधारे विभागाला शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचेल, याची काळजी घेण्याचे तसेच पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून गरजेनुसार नियोजन करण्याचे निर्देश दिले. पाणी सोडताना स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सूचनांचा विचार करावा, असेही मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

या बैठकीस आमदार काशिनाथ दाते, विक्रम पाचपुते (दूरदृश्य प्रणालीद्वारे), ज्ञानेश्वर कटके, शरद सोनवणे, नारायण पाटील, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, कृष्णा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता हेमंत धुमाळ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर आणि समितीचे सदस्य उपस्थित होते.

जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी सभापतीची भूमिका महत्त्वाची-प्रा.शिंदे

नेवासा । प्रतिनिधी

देशाची खरी लोकशाही ही राज्यात विधानसभा व विधान परिषद आणि देशात लोकसभा आणि राज्यसभा या ठिकाणी असते. जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी हे न्याय मंदिर आहे. या ठिकणी उजव्या बाजूला सत्ताधारी व डाव्या बाजूला विरोधी पक्ष आणि या दोघांचा दुवा म्हणून सभापतीची भूमिका महत्वाची ठरते.

वंचित आणि अन्यायग्रस्त जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी सभापतीची भूमिका ही महत्त्वाची असते, असे प्रतिपादन विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले.

आमदार विठ्ठलराव लंघे पाटील आणि पंचगंगा उद्योग समूहाचे संस्थापक प्रभाकर (काका) शिंदे यांनी महायुतीमध्ये निवडून आलेल्या जिल्ह्यातील नवनिर्वाचित आमदारांचा सत्कार व नेवासा तालुक्यातील मतदारांचे जाहीर आभार कार्यक्रमाचे



आयोजन नेवासा येथील आराध्य मंगल कार्यालयामध्ये केले होते. यावेळी सभापती शिंदे बोलत होते.

यावेळी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार विजय शिवतारे, आ. काशीनाथ दाते, आ.अमोल खताळ, आ. विक्रम पाचपुते, आ. विठ्ठलराव लंघे पाटील,पंचगंगा उद्योग समूहाचे संस्थापक प्रभाकर शिंदे, उत्तर अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, शेतकरी संघटनेचे अजित काळे, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर पेचे, संभाजी दहातोंडे, किसनराव गडाख, राष्ट्रवादीचे युवानेते अब्दुल शेख आदीउ पस्थित होते.

शिंदे यांनी आपल्या खास शैलीत आमदारांची कहाणी सांगितली. आमदार काशिनाथ दाते यांना बळजबरीने तिकिट दिले. आमदार विक्रम पाचपुते यांना तिकीटच नव्हते तर संगमनेरमध्ये नेमका पराभव कोणाचा व विजय कोणाचा हेच समजत नव्हते. हा तिकडे झालेला पराभव देखील एक रेकॉर्ड झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे म्हणाले की, ज्ञानेश्वर मंदिराचा आराखडा इतका उत्कृष्ट असेल की इथे राज्यात नव्हे देशात नाव निघेल. राज्यात प्रचंड बहुमताने आलेले सरकार ही लाट नसून लाडक्या बहिणीचा आशीर्वाद आहे. हे सरकार आश्वासन देणारे नसून काम करणारे सरकार आहे. देशात किंवा राज्यात असा एकही शेतकरी नसेल किंवा असे एकही कुटुंब नसेल की त्या व्यक्तीला सरकारचा फायदा झालेला नसेल. प्रत्येक कुटुंबाला योजनेच्या माध्यमातून पैसे मिळाले. येथे सुद्धा शनिदेव असून, भावी मंत्र्यांचे बोर्ड लावणाऱ्यांचा पराभव होऊन तालुका हा दहशतमुक्त, वाळूमाफिया मुक्त झालेला असून यापुढील काळात येथे विठ्ठलराव लंघे यांच्या माध्यमातून विकासाचा डोंगर उभा राहणार असल्याचे विखे यांनी सांगितले.

कार्यक्रमाला शिवसेना तालुकाध्यक्ष सुरेश डिके, शिवसेना विधानसभा प्रमुख भाऊसाहेब वाघ, अशोक करडक, अंकुश काळे, ऋषिकेश शेटे, प्रताप शिंदे, डॉ.बाळासाहेब कोलते यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. भारत करडक यांनी सूत्रसंचालन केले. ज्ञानेश्वर पेचे यांनी आभार मानले.

सोमैया विद्यामंदिर येथे माजी विद्यार्थी व माजी शिक्षक मेळावा उत्साहात साजरा

कोपरगाव । प्रशांत टेके पाटील

कोपरगाव तालुक्यातील वारी येथील सोमैया विद्यामंदिर येथे १९५९ ते २०२५ पर्यंतचे सर्व माजी विद्यार्थी व माजी शिक्षक यांचा संयुक्त मेळावा ४ जानेवारी २०२५ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येक व्यक्ती दैनंदिन कार्यात व्यस्त असला तरी, त्यांना आपल्या जुना मित्रमंडळींमध्ये जाऊन मन मोकळं करण्याची इच्छा असते. त्यामुळे सोमैया विद्यामंदिर येथे माजी विद्यार्थी व माजी शिक्षक यांचा संयुक्त स्नेह मेळावा अत्यंत उत्साही वातावरणात पार पडला, जिथे सर्वजण एकमेकांशी मोकळेपणाने संवाद साधताना आणि एक दुसऱ्याची आपुलकीने चौकशी करत होते.

३०-४० वर्षांनंतर एकमेकांना भेटल्यावर बदललेले चेहरे आणि शरीरबांधामध्ये ओळख पटवताना काही क्षण वेगळे वाटले, पण नाव सांगितल्यावर विद्यार्थी एकमेकांना मिठ्या मारत आनंदी झाले. या प्रसंगी अनेकांचे डोळे पाण्याने ओले झाले होते.

स्नेह मेळाव्याचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती माता आणि स्व. करमशीभाई सोमैया यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाला. १९५९ पासून २०२४ पर्यंतच्या माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यासाठी पाटील



, शिंदे , शिरसाठ, क्षेत्रे , राऊत गुरुजी, पवार काका, गोदावरी बायो रिफायनरीचे सचिव सुहास गोडगे, कु. अश्विनी शेळके, गणेश पाटील, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नामदेव जाधव आणि उपाध्यक्ष पत्रकार प्रशांत टेके यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.दिल्लीपासून ते महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील माजी विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी आपल्या शालेय आठवणींना उजाळा देण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.

या मेळाव्यात माजी शिक्षकांनी आपल्या मनोगतातून आठवणींना उजाळा देऊन आजच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन केले. माजी विद्यार्थ्यांनी त्यांच्या संघर्षमय जीवनातील यशाची कहाणी सांगून, काही माजी विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या यशस्वीतेच्या कहाण्या ऐकून उपस्थित अनेकांच्या डोळ्यात पाणी आले.या मेळाव्याचे प्रास्ताविक विद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनीता पारे यांनी मांडले. सूत्रसंचालन निकम , नागरे , आणि गायकवाड सर यांनी केले. माजी शिक्षकांचा परिचय राऊत यांनी केला, तर आभार प्रदर्शन खटावकर यांनी केले. मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

रेझींग डे सप्ताहानिमित्त पोलीस प्रदर्शनी उद्घाटन सोहळा

भंडारा । प्रतिनिधी

भंडारा जिल्हा पोलीसांनी ०६ जानेवारी रोजी पोलीस प्रदर्शनाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी विशेष पोलिस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, डॉ. दिलीप भुजबड, भंडारा पवनी विधानसभा क्षेत्राचे आमदार नरेंद्र भोंडेकर, भंडारा जिल्हा पोलीस अधीक्षक नुरुल हसन, आणि अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांची उपस्थिती होती.

पोलीस रेझींग डे सप्ताहाच्या अनुषंगाने भंडारा जिल्हा पोलीसांकडून जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनवर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच, भंडारा जिल्हा पोलीस दलाने ०६ जानेवारी ते ०८ जानेवारी या कालावधीत पोलीस परेड ग्राउंड, पोलीस मुख्यालय, भंडारा येथे सकाळी १०:०० ते सायंकाळी ६:०० पर्यंत निःशुल्क पोलीस प्रदर्शनाचे आयोजन केले आहे.

सदर प्रदर्शनात १९ विविध स्टॉल्स लावण्यात आले आहेत. यामध्ये मॉडेल पोलीस स्टेशन, महाराष्ट्र आपत्कालीन प्रतिसाद प्रणाली (डायल ११२), आर्म्स, वायरलेस विभाग, फूड स्टॉल, शूटिंग स्टॉल, श्वान पथक, मोटार परिवहन विभाग, भरोसा सेल, तक्रार निवारण, आर्थिक गुन्हे शाखा, सुरक्षा सेल,



बॉम्ब शोधक व नाशक पथक, सायबर बोट, सायबर सेल, एनडीपीएस, फॉरेन्सिक माहिती स्टॉल, काइम अँड क्रिमिनल ट्रॅकिंग अँड नेटवर्क सिस्टम, अचिव्हमेंट भंडारा पोलीस, तसेच ट्रॉफिक विभाग यांचा समावेश आहे.

सदर प्रदर्शनीमधून पोलीस कार्यप्रणाली, नागरिकांची सुरक्षा, आणि पोलीस दलाची विविध यंत्रणा याबाबत माहिती देण्यात येईल. प्रदर्शन दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये भंडारा पोलीस सायबर बॉट या नवीन ऑनलाईन सायबर फॉड मार्गदर्शन प्रणालीचे उद्घाटन, मुद्देमाल व हरविलेले मोबाईल वितरित करणे, आणि पोलीस पाटील यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. यानंतर पोलीस पाटील यांचा सत्कार करण्यात आला. तसेच, प्रकाश हायस्कूल भंडारा आणि महर्षी स्कूल येथील शिक्षक व विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते.

जिल्ह्यातील नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना या प्रदर्शनाला सहकुटुंब व सहपरिवार भेट देण्याचे आवाहन भंडारा पोलीस अधीक्षक नुरुल हसन यांनी केले आहे

प्रा.शिंदे यांचा महायुतीच्या वतीने भव्य सत्कार होणार!

युवा आमदार विक्रमसिंह पाचपुते यांची घोषणा

अहिल्यानगर । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय आणि कर्जत-जामखेडचे भूमिपुत्र प्रा. राम शिंदे यांची विधान परिषदेच्या सभापतीपदी निवड झाली. राम शिंदे हे अहिल्यानगर जिल्ह्यातील विधान परिषदेच्या सभापतीपदी पोहोचणारे चौथे व्यक्ती ठरले आहेत. तसेच, धनगर समाजातून या पदावर निवड होणारे ते कदाचित पहिलेच व्यक्ती असावेत, अशी चर्चा रंगली आहे.

राम शिंदे यांच्या सन्मानार्थ काल शनिवारी अहिल्यानगर येथील माऊली सभागृहात सर्वपक्षीय सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे होते. तसेच पोपटराव पवार, आमदार सत्यजित तांबे, आमदार हेमंत ओगले यांसह अनेक नेते उपस्थित होते.

राम शिंदे यांच्या सत्कार सोहळ्यात महाविकास आघाडीच्या नेत्यांची लक्षणीय उपस्थिती पाहायला मिळाली. मात्र, महायुतीतील भाजपच्या आमदारांनी या कार्यक्रमाला दांडी मारली. विशेषतः, भाजपच्या महत्त्वाच्या नेत्यांची अनुपस्थिती चर्चेचा विषय बनली.या संदर्भात भाजपचे ज्येष्ठ आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी स्पष्ट केले की, शिर्डी येथे होणाऱ्या भाजपच्या



महामेळाव्याच्या नियोजन बैठकीसाठी उपस्थित राहावे लागल्याने सत्कार सोहळ्यात सहभागी होता आले नाही.

दरम्यान, भाजपचे युवा आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी सांगितले की, खासगी घरगुती कार्यक्रमासाठी बाहेरगावी असल्यामुळे सत्कार सोहळ्याला उपस्थित राहता आले नाही. मात्र, ही कसर भरून काढण्यासाठी महायुतीच्या वतीने प्रा. राम शिंदे यांचा भव्य सत्कार सोहळा लवकरच आयोजित केला जाईल. रविवारी, श्रीगोंदा मतदारसंघातील श्री क्षेत्र आगडगाव देवस्थान समितीच्या वतीने आमदार शिवाजीराव कर्डिले आणि विक्रमसिंह पाचपुते यांचा लाडूतुला करून सत्कार करण्यात आला. देवस्थान समितीने या सत्काराचे कारण सांगताना म्हटले की, आमदारांचे नेहमीच देवस्थानला सहकार्य असते, त्यामुळे या जागृत देवस्थानकडून सन्मान होणे हे भाग्याचे प्रतीक आहे.यावेळी युवा आमदार विक्रमसिंह पाचपुते म्हणाले, आगडगाव देवस्थानकडून मिळालेला सन्मान हे आमच्या कार्याचे मूल्यांकन आहे. जागृत देवस्थानाकडून सन्मान होणे हा खरोखरच अभिमानाचा क्षण आहे.राम शिंदे यांच्या आगामी सत्कार सोहळ्यासाठी महायुतीचे विशेष नियोजन कसे असेल, याकडे सध्या सर्वांचे लक्ष लागले आहे.

चिंचोली येथील गुरव शिवारात दुचाकी अपघातात एकाचा मृत्यू



संगमनेर । प्रतिनिधी

चिंचोली गुरव (ता. संगमनेर) येथील सामाजिक कार्यकर्ते पोपट सीताराम गोडगे (वय ६०) यांचा दुचाकी अपघातात मृत्यू झाला. गुरुवारी रात्री आठ वाजेच्या सुमारास चिंचोली गुरव शिवारात हा अपघात घडला.

पोपट गोडगे यांच्या निधनाने चिंचोली गुरव गावावर शोककळा पसरली आहे. अपघातामुळे त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने तातडीने त्यांना संगमनेर येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान शुक्रवारी त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

त्यांच्या पश्चात वडील, एक भाऊ, एक बहीण, पत्नी, एक मुलगा आणि दोन मुली असा परिवार आहे. शिक्षक दत्तात्रेय गोडगे यांचे ते बंधू आणि अक्षय गोडगे यांचे वडील होते. स्व. पोपट गोडगे यांनी ग्रामविकास आणि सामाजिक कार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या शिर्डी लोकसभा प्रमुखपदी सुनिता शेळके

कोल्हार । प्रतिनिधी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार श्रीकांत शिंदे आणि मंगेश चिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या शिर्डी लोकसभा प्रमुखपदी सुनिता शेळके यांची निवड झाली आहे. श्रीक्षेत्र कोल्हार भगवतीपुर येथील सुनिता शेळके यांना मिळालेल्या या जबाबदारीमुळे नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे.

शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून गरजू, गोरगरीब, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रुग्णांना सर्व आरोग्य योजनांचा लाभ देण्यासाठी ही निवड करण्यात आली आहे. शिर्डी लोकसभा कार्यक्षेत्रातील रुग्णांना राखीव कोट्यातून रुग्णालयात खाटा उपलब्ध करून देणे, मोफत किंवा सवलतीच्या दरात शस्त्रक्रियांची सुविधा देणे, तसेच त्यांना योग्य मार्गदर्शन मिळवून देणे हे या कक्षाचे



उद्दिष्ट आहे.

सुनिता शेळके यांना नियुक्तीपत्र शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष महाराष्ट्र राज्य प्रमुख रामहरी राऊत यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी माध्यमांशी बोलताना सुनिता शेळके म्हणाल्या, मुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे आणि राज्य प्रमुख रामहरी राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही काम करत असून, शिर्डी लोकसभा कार्यक्षेत्रातील एकही गरजू रुग्ण उपचाराविना वंचित राहणार नाही, यासाठी प्रयत्नशील राहू.

या कार्यक्रमाला शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख सचिन शेटे (सांगली), प्रशांत साळुंखे (कोल्हापूर), भूषण सुर्वे (पुणे), मनीष बाजाड (अकोट), गौरव काटोले (अकोला), स्मिता देवकर (मुंबई), आणि सुमन पारखे (मुंबई) उपस्थित होते. सुनिता शेळके यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

राज्यातील इयत्ता १ ते ७ च्या शाळांना १०० पटास मुख्याध्यापक पद मिळावे

ना.दादा भुसे यांच्याकडे पुरोगामी शिक्षक संघटनेची मागणी

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष प्रसाद पाटील यांनी राज्याचे शिक्षणमंत्री मा. दादा भुसे यांच्याकडे राज्यातील इयत्ता १ ते ७ च्या शाळांना १०० पटास मुख्याध्यापक पद मंजूर करण्याची मागणी केली.

प्रसाद पाटील यांनी ही मागणी मुंबईतील गुणवत्तापूर्ण आनंददायी शिक्षण या विषयावर झालेल्या चर्चासत्रात केली, ज्या सत्रात शिक्षणमंत्री भुसे तसेच राज्यातील विविध शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. पाटील यांनी सांगितले की, २०१५ च्या शासन निर्णयानुसार इयत्ता ६ वी ते ८ वी शाळांना १०० पटास मुख्याध्यापक पद दिले



आहे, पण इयत्ता १ ते ७ शाळांना हे अधिकार मिळालेले नाही. त्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सर्व शाळांमध्ये मुख्याध्यापक व पुरेसे शिक्षक असणे आवश्यक आहे.

चर्चासत्रात ना.दादा भुसे यांनी सर्व शिक्षक संघटनांच्या मागण्यांवर सकारात्मक विचार करत, प्रलंबित मागण्यांपैकी अनेक मागण्या टप्प्याटप्प्याने सोडवण्यात येतील असे आश्वासन दिले निवेदनात संघटनेने विविध मागण्या मांडल्या, ज्यात जुनी पेन्शन योजना लागू करणे, शिक्षकांना मुख्यालयी राहण्याची अट शिथील करणे, सर्व शाळांना कला व शारीरिक शिक्षण शिक्षक मिळवून देणे आणि शालेय पोषण आहार यंत्रणेतील त्रुटी दूर करणे यांचा समावेश होता. चर्चा सत्रास राज्य शालेय शिक्षक विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंग आणि अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

वर्धा जिल्ह्यातील खेळाडूंची भारतीय संघात निवड



पुलगाव । प्रतिनिधी

दिनांक १० जानेवारी ते १४ जानेवारी दरम्यान होणाऱ्या साऊथ आशिया स्पर्धेसाठी वर्धा जिल्ह्यातील ११ खेळाडूंची भारतीय संघात निवड झाली आहे.

वर्धा जिल्हा व ग्रामीण पोलीस दलातील मनीष देशमुख, आशिष देशमुख, देवेंद्र उडान, शिक्षण क्षेत्रातील प्रा. प्रवीण शेळके, देवेंद्र सोनटक्के, आणि प्रशांत मेश्राम, तसेच आरोग्य विभागातील दिनेश देशमुख, रवी देशमुख व कैलाश बाकरे, आणि सी ए डी पुलगाव येथील रुपेश चापडे यांचा या मास्टर्स संघामध्ये समावेश आहे.

मंगलोर, कर्नाटकमध्ये होणाऱ्या या मास्टर्स स्पर्धेत भारत, जपान, श्रीलंका, बांगलादेश, नेपाळ, भूतान सारख्या देशांचे खेळाडू सहभागी होणार आहेत. वर्धा जिल्ह्यातील या खेळाडूंनी विविध मैदानी स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. यापूर्वी त्यांनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर अनेक मास्टर्स स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवून यश प्राप्त केले आहे. या स्पर्धेमध्येही भारताला अनेक पदक मिळवून देण्याचा निर्धार वर्धा जिल्ह्यातील खेळाडूंनी व्यक्त केला आहे.

टाकळी येथील शेतकऱ्यांचा आक्रोश भ्रष्टाचाराच्या विरोधात आंदोलन

भंडारा । प्रतिनिधी

जमिनीचे सर्वेक्षण आणि शेतकऱ्यांचा आक्षेप भंडारा जिल्ह्यापासून सात किलोमीटर अंतरावर असलेल्या वैनगंगा आणि सूर नदीच्या तीरावरील जुनी टाकळी गावातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनींचे गोसे खुर्द पुनर्वसन विभागीय पथक नागपूरमार्फत सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणाच्या यादीचे प्रकाशन दिनांक १७ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आले. परंतु या यादीमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. त्यामुळे त्यांनी आपले हरकती नोंदवत ६ जानेवारी २०२५ रोजी चक्काजाम आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.



प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यामुळे ६ जानेवारी २०२५ रोजी शेतकऱ्यांनी कोतुर्णा रोड, भंडारा येथे दुपारी ३.३० वाजता चक्काजाम आंदोलन केले. यावेळी जिल्हाधिकारी भंडारा यांच्यामार्फत मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना निवेदन पाठवण्यात आले. या आंदोलनादरम्यान असे समोर आले की, ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी बुडीत क्षेत्रात येत नाहीत, त्यांच्या जमिनी बुडीत क्षेत्रात दाखवून रजिस्ट्री नोटीस दिल्या गेल्या. याशिवाय, काही शेतकऱ्यांच्या वडिलोपार्जित विहिरींचे गाळ काढून त्यांना शासनाच्या अनुदानापासून वंचित ठेवण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारींकडे अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले. नागपूर येथील अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या आरोपांना पैशाचा लोभ असल्याचे म्हणत उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संताप निर्माण झाला असून त्यांनी या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात पंधरा दिवसांत योग्य चौकशी करून अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याची मागणी केली आहे. जर मागण्या पूर्ण न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.

यावेळी अन्यायग्रस्त शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष चंद्रशेखर भिवगडे, कोठेराम पवनकर, पुरुषोत्तम गायधने, मोहन गायधने, नितेश बोरकर, विष्णुदास लोणारे, धनराज राहाटे, देवराम भेदे, किसन रहाटे, शिवलाल रहाटे, दामोदर रहाटे, रामचंद्र लोणारे, दादाराम गायधने ,मंगल उरकुडे, असे मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

शिर्डीत येताच शिरसाट म्हणाले सुजय विखेंची भूमिका योग्य

अहिल्यानगर । प्रतिनिधी

शिर्डीत मोफत भोजन बंद करण्यासंदर्भातील भाजपचे माजी खासदार सुजय विखे यांच्या विधानावर टीका करणाऱ्या राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी आज आपली भूमिका बदलली. शिर्डीत सहकुटुंब साईबाबांचे दर्शन घेतल्यानंतर शिरसाट यांनी विखे यांच्या विधानामागील उद्देश योग्य असल्याचे सांगितले.



काल मला सुजय विखे यांच्या वक्तव्याची संपूर्ण माहिती नव्हती, त्यामुळे मी त्यावर टीका केली होती. मात्र, आज प्रत्यक्ष भेटीत त्यांच्या विधानामागचा हेतू समजावून घेतला तेव्हा तो योग्य असल्याचे मला वाटले, असे शिरसाट यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले.

शिर्डीत मोफत भोजन बंद करा, कारण त्यामुळे सगळे भिकारी इथे येतात, असे विधान सुजय विखे यांनी केले होते. या विधानामुळे विविध स्तरांतून टीका झाली. विखे यांनी स्पष्टीकरण देताना सांगितले की, शिर्डीत काही नशेखोर व्हाईटनरच्या नशेत येत असल्याचे आढळले आहे. अशा व्यक्तींना पायबंद घालण्यासाठी त्यांनी मोफत भोजन बंद करण्याची सूचना केली होती. त्यांच्या विधानाचा उद्देश साईभक्तांचा अवमान करणे हा नव्हता.

साईभक्तांचा अनादर करण्याचा विखे यांचा हेतू नव्हता. शिर्डीत साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांचे आदरातिथ्य कायम राहील. संस्थानच्या प्रसादालयात मोफत भोजन सुरूच राहील, त्यावर कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही, असे शिरसाट यांनी स्पष्ट केले.

हा वाद आता अधिक वाढू न देता त्यावर पडदा पडावा, असेही शिरसाट म्हणाले.

यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील बारावी कला व वाणिज्य वर्गाचा निरोप समारंभ संपन्न

सोलापूर । प्रतिनिधी

विद्या विकास मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात बारावी कला व वाणिज्य वर्गाचा निरोप समारंभ विजयश्री सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य संभाजी किर्दक होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला इयत्ता बारावी कॉमर्सच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा सन्मान करून आपल्या भावना व्यक्त केल्या. अमृता सांगळे, प्रज्वल मोरे, वैष्णवी खोमणे, संस्कृती काळे, सानिका देशमाने, श्रावणी शिंदे आणि रोहन थोरवे या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील दोन वर्षांच्या अनुभवांची आठवण सांगत शिक्षकांनी केलेल्या मार्गदर्शनाचे महत्त्व पटवून दिले.

राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक प्रा. लक्ष्मण राख यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी वाणिज्य शाखेतून नोकरी व व्यवसायाच्या संधी कशा उपलब्ध होऊ शकतात, यावर मार्गदर्शन केले. प्रा. संध्या बिले यांनी विद्यार्थ्यांना शिदोरीच्या उपयोगाचा महत्व पटवून देत वाणिज्य शाखेतून उघडणाऱ्या व्यावसायिक संधींविषयी मार्गदर्शन केले.



सुरेखा जाधव यांनी विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून ती साकार करण्यासाठी जिद्द व चिकाटी ठेवावी, मुलींनी निर्भयतेने प्रत्येक प्रसंगाला सामोरे जावे, असे आवाहन केले. प्रा. जाधव एम.डी. यांनी अर्थशास्त्राचे महत्त्व पटवून देत ते जीवनासाठी किती आवश्यक आहे हे स्पष्ट केले. अध्यक्षीय मनोगतात उपप्राचार्य संभाजी किर्दक यांनी विद्यार्थ्यांना गुणवत्तेबरोबरच संस्कार, परंपरा व चारित्र्याचे महत्त्व पटवून दिले. महाविद्यालयातील विविध सुविधांचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांनी यशाचे शिखर गाठावे, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सायली साळुंखे व प्रतीक्षा तरंगे यांनी केले. प्रास्ताविक निकिता शेळके हिने केले, तर आभार प्रदर्शन सानिका भोगे हिने मानले. कार्यक्रमाला बारावी कला व वाणिज्य वर्गाचे विद्यार्थी आणि प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संजीवनी गृप आफ इन्स्टिट्यूट व संजीवनी उद्योग समूह आयोजित पत्रकार दिन समारंभ मोठ्या उत्साहात साजरा

प्रशांत टेके पाटील । कोपरगाव

दि ६ जानेवारी २०२५ रोजी कोपरगाव येथील पत्रकारांचा यथोचित सन्मान व सत्कार आयोजित करण्यात आला होता. पत्रकार दिन समारंभ शुभारंभ दिप प्रज्वलन करून व दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर आणि सहकार महर्षि शंकररावजी कोल्हे यांच्या प्रतिमा पुजनाने झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदू जोशी साहेब, अमितदादा कोल्हे , विवेकभैय्या कोल्हे,उद्योगपती अग्रवाल, अत्रे साहेब,विवेक कोल्हे यांनी सांगितले की, पत्रकारांचे प्रश्न सोडवण्यासाठी शासनाने गांभीर्याने विचार करावा.तसेच पत्रकारांसाठी लाडकी बहिण योजनेसारखी पत्रकार मानधन योजना सुरू करण्याचे आवाहन शासनाला केले आहे.पत्रकारांनी सुद्धा तालुक्यातील



नेत्यांना एका व्यासपीठावर एकत्र करून सर्वसामान्य माणसाला व तालुकाला समृद्ध करण्यासाठी प्रयत्न करावेत. अध्यक्ष यदू जोशी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पत्रकारांची आर्थिक परिस्थिती अतिशय खालावलेली कायमच असते. आई टीबीने वारल्यानंतर अठरापगड जातीच्या लोकांच्या आधारावर जगलो.मेहनतीवर जगतो आणि खातो. महाराष्ट्र राज्यात काळाची गरज म्हणून पत्रकाराना विरोधीपक्ष नेता व्हावे लागेल.ए आय टिकवावी लागेल.पत्रकारानी विश्वासाहर्ता टिकवावी लागेल.आपली विश्वासाहर्ता आपल्या वागण्यात पण असलीच पाहिजे.पत्रकार २४ तास पत्रकाराता करणारा असावा.नेत्याकडून जर मेहरबानी घेत असतील तर तुमचे कोणतेही काम होऊ शकत नाही.कोल्हे परीवाराने स्किल डेव्हलपमेंट कामाची सुरुवात करावी. ग्रामपंचायत पासून आमदार खासदार पर्यंत सर्वांना प्रशिक्षण देऊ शकेल असे सेंटर उभे करावेत. प्राकटीकल जर्नालिझम राष्ट्रव्यापी संस्था उभी करावी.सरकारच्या विरोधात बातम्या लिहावे लागेल .पत्रकारीता करताना समोरच्या मुका मार द्या पण रक्तबंबाळ करू नका. पत्रकारांनी राजकारण हे राजकारणाच्या चष्म्यातून पाहा व लिखाण करा असे आवाहन पत्रकारांना केले. सुत्रसंचालन प्रा. दवंगे यांनी केले.

गौरव शामकुळे २०२५ युवा प्रेरणा पुरस्काराने सन्मानित

मुल । प्रतिनिधी

नैसर्गिक पर्यावरण संवर्धन व मानवता विकास संस्थेच्या वतीने मुल येथे आयोजित राष्ट्रीय पर्यावरण संमेलनात देशभरातून संस्थेच्या प्रतिनिधींनी सहभाग नोंदवला. या संमेलनात स्वच्छता मित्र म्हणून प्रसिद्ध असलेले सामाजिक कार्यकर्ते गौरव शामकुळे आणि त्यांच्या सहकार्यांना २०२५ युवा प्रेरणा पुरस्कार देऊन गौरवीण्यात आले.

नैसर्गिक पर्यावरण संवर्धन व मानवता विकास संस्था ही देशातील पर्यावरणावर काम करणारी एक मोठी संस्था आहे, आणि तिच्या कार्याचा विस्तार देशभर केला गेला आहे. अशा नामांकित संस्थेच्या वतीने गौरव शामकुळे आणि त्यांच्या सहकार्यांनी मुल आणि आजूबाजूच्या परिसरात गेल्या काही वर्षांपासून अविरतपणे सुरु असलेल्या स्वच्छतेच्या कार्यासाठी या पुरस्काराने त्यांना सन्मानित केले.



संमेलनात राज्याचे माजी कॅबिनेट मंत्री आणि आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते गौरव शामकुळे आणि त्यांच्या सहकार्यांना २०२५ युवा प्रेरणा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

गौरव शामकुळे आणि त्यांच्या सहकार्यांच्या कार्याला मित्रपरिवार आणि प्रतिष्ठित नागरिकांकडून कौतुक करण्यात आले आहे.

पुलगावला शौर्यदिना निमित्त रक्तदान शिबीर



पुलगाव । प्रतिनिधी

येथील समता सैनिक दल व सिद्धार्थ नवयुवक वाचनालय, पुलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ०५ जानेवारी २०२५ रोजी शौर्य दिनानिमित्त रक्तदान शिबीर सिद्धार्थ नवयुवक वाचनालय येथे आयोजित करण्यात आले.

रक्तदान हे आपल्या लढवय्ये पूर्वजांना मानवंदना देण्याचे एक महत्त्वपूर्ण कार्य आहे. या शिबीरात एकूण ३३ रक्तदात्यांनी रक्तदानास सहभाग घेतला. त्यांची नावे खालीलप्रमाणे:

रवींद्र मेश्राम, उमेश गणवीर, प्रफुल काळे, कपिल कळंबे, योगेश ताटे, राहुल वैद्य, गौतम शिंपी, महेंद्रकुमार बेले, विनोद खोब्रागडे, अमोल मेश्राम, संदीप सावंत, सौ. शालू गडीकर, कु. संस्कृती गडीकर, राजेंद्र गणवीर, सुनील रामटेके, प्रकाश करवाडे, विजय खोबे, पियुष ठाकूर, भरत चौधरी, सुमित जारुंडे, सुमेध गजभिये, महेश दिघाडे, सुरज मांढरे, इरफान बिग, प्रफुल ढेपे, कु. हर्षाली चव्हाण, आकाश पाटील, सुशील बांगर, अमितकुमार उमरे, अभिलाष दरवडे, संजय वासनिक, प्रसन्नजीत ढेकले, निखिल साखरे.

या वेळी शौर्य दिनाच्या तसेच नवीन वर्षाच्या शुभेच्छा देत सर्व रक्तदात्यांचे आभार व्यक्त करण्यात आले. रक्तदान शिबिर यशस्वी होण्यासाठी समता सैनिक दलाचे सर्व मार्शल, तसेच सिद्धार्थ वाचनालयाचे सर्व पदाधिकारी व कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले. सेवाग्राम रुग्णालयाची रक्तपेढी टीमही शिबीराच्या यशस्वी आयोजनासाठी उपस्थित होती.

कृषी कन्यांकडून ड्रम रोलिंगचे प्रात्यक्षिक, भुईमूग उत्पादन वाढवण्याचे मार्गदर्शन



सोलापूर । प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यातील दहिगाव (ता. माळशिरस) येथील डॉ. शरदचंद्र पवार कृषी महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी भुईमूग पिकामध्ये ड्रम रोलिंगचे प्रात्यक्षिक सादर केले. या प्रात्यक्षिकाद्वारे शेतकऱ्यांना पेरणीनंतर ५० दिवसांनी ड्रम फिरवल्यास भुईमूग शेंगांचे उत्पादन १० ते १५ टक्क्यांनी वाढू शकते, हे पटवून दिले.

यावेळी मिनल माने, संचिता डोंबाळे, समृद्धी बोडके, मधुरा कोंडे, दमयंती वनवे, राजश्री सूर्यवंशी आणि शीतल शिंदे यांनी ड्रम रोलिंगची प्रक्रिया, ड्रमचा आकार, वापराची काळजी याबद्दल सविस्तर माहिती दिली. गावातील शेतकऱ्यांनी या प्रात्यक्षिकाला चांगला प्रतिसाद देत उत्पादनवाढीसाठी या तंत्राचा अवलंब करण्याचा निर्धार व्यक्त केला.

अजिंक्यराणा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त पंधरा दिवस अगोदरच सत्कार समारंभांची सुरुवात



मोहोळ । प्रतिनिधी

माजी आमदार राजन पाटील यांचे द्वितीय चिरंजीव आणि सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांच्या २० जानेवारी रोजी होणाऱ्या वाढदिवसाच्या निमित्ताने मोहोळ तालुक्यात विविध गावांमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही पंधरा दिवस आधीपासूनच सत्कार समारंभांची मालिका सुरू झाली आहे. प्रत्येक दिवशी दोन ते तीन गावांमध्ये सर्वसामान्य जनतेच्या वतीने अजिंक्यराणा पाटील यांचे औक्षण करून, केक कापून आणि सन्मानित करून शुभेच्छा दिल्या जात आहेत. यंदाच्या या कार्यक्रमाची सुरुवात अजिंक्यराणा पाटील यांचे सहकारी मित्र विठ्ठल उर्फ बंटी गुंड यांच्या हस्ते करण्यात आली. बिटले येथील विशाल चोपडे यांच्या निवासस्थानीही केक कापून सत्कार सोहळा पार पडला.

२० जानेवारीपर्यंत दररोज विविध गावांमध्ये सार्वजनिक ठिकाणी आणि मित्रपरिवाराच्या निवासस्थानी साधेपणाने हा सत्कार समारंभ चालू राहणार आहे. अजिंक्यराणा पाटील यांचे वडील माजी आमदार राजन पाटील, थोरले बंधू बाळराजे पाटील आणि आजोबा कै. लोकनेते बाबुराव (आण्णा) पाटील यांच्या विचारांचा वारसा कमी वयात त्यांनी भक्कमपणे पुढे नेला आहे.

तालुक्यातील सर्वसामान्य माणसांशी मनाने जोडले गेल्याने, जानेवारी महिना अजिंक्यराणा उत्सव म्हणून साजरा होतो. त्यांच्या नेतृत्वगुणांमुळे व विचारांमुळे तालुक्यात त्यांच्याविषयी विशेष आदरभाव आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

भंडारा पत्रकार भवन महाराष्ट्रात नावारूपास येणार–आ.भोंडेकर

पत्रकार दिन कार्यक्रमाप्रसंगी सर्वतोपरी मदत देण्याचे आश्वासन

भंडारा । प्रतिनिधी

दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ भंडारा जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे दि.६ जानेवारी २०२५ रोजी पत्रकार भवनात पत्रकार दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भंडारा जिल्हा मराठी पत्रकार भवन महाराष्ट्रात नावारूपास येणार आहे. पत्रकार भवनाच्या इमारतीकरिता जेवढी मदत लागेल ते सर्वतोपरी देण्याचे आश्वासन आ. नरेंद्र भोंडेकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले. यावेळी भंडारा जिल्हा मराठी पत्रकार संघाच्यावतीने समित्यांची घोषणा करण्यात आली.



याप्रसंगी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरूवात करण्यात आली. यावेळी मंचावर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष सुनील फुंडे, भंडारा जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष चेतन भैरम, जिल्हा माहिती अधिकारी शैलजा वाघ, सचिव मिलिंद हळवे, उपाध्यक्ष राकेश चेटुले, कोषाध्यक्ष डी.एफ. कोचे, वरिष्ठ पत्रकार गोपालकृष्ण मांडवकर, हिवराज उके, मो.आबिद सिद्दीकी आदी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी आ. नरेंद्र भोंडेकर यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच भारताच्या आट्यापाट्या संघाचे प्रतिनिधित्व करणार्या प्राची केशव चटप हिचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाप्रसंगी छत्तीसगड राज्यातील बस्तर जिल्ह्यातील एनडीटीव्ही प्रतिनिधी दिवंगत चंद्रहार यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. मराठी पत्रकार भवन हे महाराष्ट्रात एकमेव असे पत्रकार भवन उभारण्यासाठी आपला सदैव पाठबळ राहणार आहे. यासाठी जेवढा निधी लागेल तेवढा निधी देण्यास आपण कटिबध्द आहे. पत्रकार भवन दोन मजली करण्याचा मानस असून झालेल्या ८० टक्के बांधकामामुळे आपण समाधानी असल्याचे मत यावेळी आ. नरेंद्र भोंडेकर यांनी उपस्थित पत्रकारांसमोर व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भंडारा जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष चेतन भैरम यांनी केले. कार्यक्रमाला जिल्हा माहिती अधिकारी शैलजा वाघ यांनी बदलत्या काळातील तंत्रज्ञान हे पत्रकारांना अवलंबण्याची गरज आहे तरच पत्रकारितेच्या क्षेत्रात पत्रकार टिकेल असे मार्गदर्शन करताना सांगितले. पत्रकारासंबंधी मिळणार्या सुविधांची शासन केवळ घोषणा करते मात्र त्याची पुर्तता होत नसल्याची खंत वरिष्ठ पत्रकार गोपालकृष्ण मांडवकर यांनी व्यक्त केली. यावेळी भंडारा जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सचिव मिलिंद हळवे, वरिष्ठ पत्रकार हिवराज उके, माजी सचिव मो.आबिद सिद्दीकी यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन डी.एफ. कोचे यांनी केले तर आभार राकेश चेटुले यांनी मानले. कार्यक्रमाला चंद्रकांत श्रीकोंडावार, विलास केजरकर, दीपक रोहनकर, सुरेश कोटगले, ललितसिंह बाच्छिल, राजू आगलावे, चंद्रकांत शहारे, देवानंद नंदेश्वर, इंद्रपाल कटकवार, शशिकांत भोयर, समीर नवाज, शेखर बोरकर, अजय मेश्राम, प्रवीण तांडेकर, सरवर शेख, उमेश जांगळे, सचिन मेश्राम, नवीन निश्चल, सैय्यद जाफरी, प्रशांत देसाई, मनोज देशमुख, वामन चांदेवार, येनोरकर, हंसराज रामटेके, नितीन कुथे, सुरेश फुलसुंगे, युवराज गोमासे, अनमोल मेश्राम, घनश्याम खडसे, जयकृष्ण बावणकुळे, सुधीर गोमासे, दिलीप बडोले, यशवंत थोटे, संजीव जयस्वाल, मनोहर मेश्राम, अमित गिर्हेपुंजे, कृष्णा बावनकुळे, सुरेंद्र चिंधालोरे, प्रमोद रणदिवे, शत्रुघ्न भांडारकर, स्वप्नील मेश्राम, अनिल रहांगडाले, सुरज निंबार्ते, नरेश बोंदरे, मुकेश मेश्राम, देवराम फटे, प्रल्हाद हुमने, विरेंद्र गजभिये, संजय भोयर, पृथ्वीराज बन्सोड आदींसह मोठ्या संख्येने पत्रकार बंधू उपस्थित होते.

पत्रकार भवनात विद्यार्थ्यांसाठी ई–लायब्ररीची गरज–सुनील फुंडे



भंडारा शहराच्या मध्यवर्ती भागात भंडारा जिल्हा मराठी पत्रकारसंघाची भव्यदिव्य पत्रकार भवन उदयास येत आहे. जिल्ह्यात एमआयडीसीसारख्या जागा असूनही पाहिजे त्याप्रमाणात उद्योगधंदे नसल्याने बेरोजगारी फोफावली आहे. सध्या स्पर्धेचे युग आहे. ग्रामीण भागातील व आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षेत टिकण्यासाठी सोय नसल्याने असे विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत मागे पडत आहेत. अशा विद्यार्थ्यांसाठी पत्रकारसंघात ई–लायब्ररीची संकल्पना जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष सुनील फुंडे यांनी मांडली. जेणेकरून गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना फायदा होईल. तसेच शेतकर्यांनी परंपरागत धान शेती न करता इतर पिकाचे उत्पादन घ्यावे. भंडारा जिल्हा हा भाताच्या जिल्ह्यासोबतच रेतीचा जिल्हा म्हणून प्रसिध्द आहे. मात्र जिल्ह्यात घरकुलासाठी महाग दराने रेती घ्यावी लागते. ही एक शोकांतिका असल्याचे मत सुनील फुंडे यांनी पत्रकार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सांगितले.

ईसापूर पिपळवाडी येथे रामायण–भागवत कथांचे आयोजनः ८ जानेवारीला समारोप

उमरखेड । प्रतिनिधी

उमरखेड तालुक्यातील ईसापूर पिपळवाडी येथे रामायण व भागवत कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक कार्यक्रम ह.भ.प. बाळू महाराज डाके यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, या कथांमुळे परिसरातील भाविकांना अध्यात्मिक आनंद आणि शांतीचा अनुभव मिळत आहे.

रामायण कथांद्वारे प्रभू श्रीरामाच्या जीवनातील आदर्श, त्याग, धर्मनिष्ठा, आणि सत्यप्रियतेचे महत्त्व भक्तांपर्यंत पोहोचवले जात आहे. तसेच, भागवत गीतेतील श्रीकृष्णाचे ज्ञान आणि जीवनमूल्यांचा अमूल्य संदेश कथामाध्यमातून सांगितला जात आहे. यामुळे भक्तगणांना सकारात्मक ऊर्जा आणि आध्यात्मिक प्रेरणा मिळत आहे.

कथासप्ताहाचा समारोप समारंभ ८ जानेवारी रोजी होणार आहे. या दिवशी सकाळी धार्मिक प्रवचने, कीर्तन, व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. विशेषतः ह.भ.प. बाळू महाराज डाके यांच्या ओजस्वी वाणीतील रामायण व भागवत कथांचे रसग्रहण ही भक्तांसाठी एक अनमोल संधी ठरली आहे. आयोजक मंडळाने सर्व भाविकांना या दिवशी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. या धार्मिक कार्यक्रमामुळे समाजात सांस्कृतिक जपणूक, सौहार्द, आणि सकारात्मकतेचा प्रसार होतो. परिसरातील नागरिकांनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून अध्यात्मिक वातावरणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

कर्जत जामखेड युवा पत्रकार संघ अध्यक्षपदी सुनील खामगळ

जामखेड । प्रतिनिधी



जामखेड युवा पत्रकार संघ कर्जत जामखेड युवा पत्रकार संघ अध्यक्षपदी कर्जत येथील सुनील खामगळ उपाध्यक्षपदी कर्जत येथील विशाल कोपनर सचिव पदी जामखेड येथील अमृत कारंडे. खजिनदार पदी धनंजय खराडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. कर्जत जामखेड युवा पत्रकार संघाचे पत्रकार सुनील गोलांडे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन्न झाली. निवडीनंतर पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. या बैठकीत यावर्षीपासून कर्जत जामखेड शहर,ग्रामीण भागात सर्व पत्रकारांनी लेखणीतून दुर्लभ , वंचित घटकांना न्याय देणार असल्याचे सांगितले. सामाजिक काम करून सर्वसामान्यांच्या प्रश्न नांना वाचा फोडण्याचे काम करण्याचे यावेळी बैठकीत ठरले.

ग्रामीण भागातून महिला उद्योजक तयार व्हाव्यात–आ.महेंद्र दळवी

रायगड । प्रतिनिधी

ग्रामीण भागातून चांगल्या महिला उद्योजकांचा उदय होणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत अलिबागचे आमदार महेंद्र दळवी यांनी व्यक्त केले. त्यांचा म्हणावा तर, ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होईल आणि महिलांची आर्थिक परिस्थिती सक्षम होईल. महिला उद्योजकतेला चालना देण्यासाठी आवश्यक सर्व मदतीची उपलब्धता करणे माझा प्रयत्न राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.



आमदार महेंद्र दळवी हे अलिबाग येथील मेघा टॉकीज येथे आयोजित धुंधूर मास उत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस महेश मोहिते, जिल्हा परिषदेच्या माजी गटनेत्या मानसी दळवी, जुईली दळवी, संजीवनी नाईक यांची प्रमुख उपस्थिती होती.

महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी उद्यान सखी आणि शिवसेना महिला यांच्या संयुक्त विद्यमाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात ४२ महिला उद्योजकांनी त्यांच्या उत्पादनांसाठी स्टॉल लावले आहेत. हा महोत्सव चार दिवस खुला राहणार असून महिलांनी तयार केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळवून देणे हा त्याचा मुख्य उद्देश आहे, असे संजीवनी नाईक यांनी सांगितले.

लाखनी तालुक्यातील रक्तदानः जीवनदायिनी रक्ताची मदत

धार्मिक प्रेरणेने आयोजित, हजारो जीव वाचवण्यासाठी एक पाऊल पुढे

भंडारा । प्रतिनिधी

भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुक्यात अनंत विभूषित जगद्गुरु श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या संकल्पनेतून प्रेरित होऊन लाखनी तालुका ग्रामीण रुग्णालयात रक्तदान महायज्ञ उत्साहात संपन्न झाला. या महायज्ञात प्रमुख अतिथी म्हणून माजी पालकमंत्री आणि विधायक डॉ. परिणयजी फुके, मुरमाडी सरपंच शेषराव वंजारी, नगरसेवक आकरे, भुते, भंडारा जिल्हा निरीक्षक भुरे, महिला जिल्हा अध्यक्ष वर्षा ताई फंदे आणि इतर मान्यवर उपस्थित होते. रक्तदान महायज्ञाच्या शिबिरात एकूण १५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यामध्ये युवक आणि युवतींनी सक्रिय सहभाग घेतला, आणि रक्तदानाच्या महत्त्वाबद्दल जागरूकता निर्माण केली. या कार्यक्रमात लाखनी सेवा केंद्र कमिटी, गुरुबंधू, संग्राम सैनिक, युवा सेना, महिला सेना आणि इतर सामाजिक संस्थांनी आपला सक्रिय सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या आयोजनात सर्व सदस्यांचे सहकार्य महत्वाचे ठरले.



या रक्तदान महायज्ञाला उपस्थित असलेल्या मान्यवरांनी रक्तदानाचे महत्त्व सांगितले आणि समाजात एकता व परस्पर साहाय्याची भावना निर्माण करण्याचे आवाहन केले. माजी पालकमंत्री डॉ. परिणयजी फुके यांनी रक्तदानाला जीवनदायिनी ठरवताना त्याच्या महत्त्वावर भाष्य केले. त्यांनी रक्तदानाचे सामाजिक दायित्व मान्य करत या महायज्ञाचे कौतुक केले.शिवाय, महाराष्ट्रातील रक्ताची कमतरता, विविध रोगांशी लढत असलेल्या रुग्णांची मदत करण्याची आवश्यकता आणि रक्तदानाच्या जनजागृतीच्या महत्वावरही चर्चा करण्यात आली. अखेर, हा महायज्ञ माऊली चरणांमध्ये अर्पित केला गेला, ज्यामुळे या कार्याची पवित्रता आणि धार्मिक भावनांचा अनुभव देणारा ठरला.

हिंगणी शिवारातील गावठी दारू भट्टीवर सेलू पोलिसांची धाड;१,६२,४०० चा मुद्देमाल जप्त

सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी

हिंगणी शेत शिवारात गावठी मोहा दारूची भट्टी सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर सेलू पोलिसांनी मोठी कारवाई केली. पोलिसांनी सापळा रचून गावठी दारूसह १,६२,४०० किमतीचा मुद्देमाल जप्त केला. दि. ४ जानेवारी रोजी दुपारी १२.३० वाजता सेलू पोलिसांनी हिंगणी शेत शिवारात धाड घालून गावठी मोहा दारूसह इतर साहित्य जप्त केले. घटनास्थळी पोलिसांनी २४० लिटर गावठी मोहा दारू, १८०० लिटर कच्चा व उकळता मोहा, लोखंडी भट्टी ड्रम, सडवा लोखंडी ड्रम, आणि इतर भट्टी साहित्य जप्त केले. जप्त मालाची एकूण किंमत १,६२,४०० आहे.धाड घातल्यावर, आरोपी कैलास काजळकर (धामणगाव), किशोर कोवे (सोंडी), आणि आनंद रॉय (हिंगणी) हे तिघेही पोलिसांना गुंगारा देऊन पसार झाले. पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा नोंद केला असून, त्यांचा शोध सुरू आहे.



ही कारवाई ठाणेदार देवेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत डी. बी. पथक प्रमुख सहाय्यक फौजदार मनोहर मुडे, निरंजन वरभे, पोलीस हवालदार अखिलेश गव्हाणे, पोलीस कॉन्स्टेबल सचिन वाटखेडे, योगेश सोरते, गंगाधर तांबरे, आणि राकेश येलमवर यांचा सहभाग होता.

गावठी दारूवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांच्या सतर्कतेमुळे हिंगणी शिवारात होणारी अवैध दारू निर्मिती आणि वाहतूक उधळून लावली आहे. पोलिसांच्या कार्यवाहीने परिसरातील अवैध दारू उद्योगावर आळा बसला आहे.

समृद्धी महामार्गावर १ कोटीहून अधिक किमतीचा सुगंधित तंबाखू जप्तः वर्धा पोलिसांची मोठी कारवाई

वर्धा । प्रतिनिधी

समृद्धी महामार्गावरून होत असलेल्या अवैध तंबाखू वाहतुकीचा पर्दाफाश करत वर्धा स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. दिल्लीहून मुंबईला जाणाऱ्या कंटेनरमधून १ कोटी ६ लाख ५०० रुपयांचा प्रतिबंधित सुगंधित तंबाखू आणि वाहतुकीसाठी वापरण्यात आलेला कंटेनर जप्त करण्यात आला.

दि. ५ जानेवारी रोजी सिंदी (रेल्वे) पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलिस पेट्रोलिंग दरम्यान गोपनीय माहितीच्या आधारे कारवाई करण्यात आली. अशोक लिलँड कंपनीचा कंटेनर (RJ-52-GA-5670) अडवून तपासणी केली असता, त्यात मोठ्या प्रमाणावर सुगंधित तंबाखू आढळला. जप्त केलेल्या माला मध्ये सुपर कॅश गोल्ड तंबाखू: ५१०३ किलो, सिग्नेचर पान मसाला: १९०१ किलो,व्ही.सी. ५ तंबाखू: ८५० किलो सदर तंबाखूची किंमत ७०,०६,५०० रुपये, तर वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या कंटेनरची किंमत ३० लाख रुपये असून एकूण मुद्देमाल १ कोटी ६ हजार ५०० रुपये इतका आहे.

पोलीसांनी कंटेनर चालक शाहीद इलियास (३२ वर्षे) आणि हाकमखान शाकिरखान (२२ वर्षे), दोघेही हरियाणातील रहिवासी, यांना अटक केली. चौकशीत, हा माल दिल्लीतील दीपक ट्रान्सपोर्टचे मालक आणि विकास छाबडा यांचा असल्याचे निष्पन्न झाले. सिंदी (रेल्वे) पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या कलम १२३, २७४, २७५, २२३ तसेच अन्न सुरक्षा कायद्याच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुराग जैन आणि अपर पोलीस अधीक्षक डॉ. सागर कवडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक विनोद चौधरी व त्यांच्या पथकाने केली. कारवाईत अनेक पोलीस अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते. वर्धा पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे समृद्धी महामार्गावर होणाऱ्या अवैध वाहतुकीला मोठा आळा बसला आहे. ही कारवाई पोलिसांच्या सतर्कतेचे आणि कर्तव्यनिष्ठेचे प्रतीक असून समाजहिताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.



त्या दिवसापासून बूट आणि घड्याळ घालणं बंद केलं!

सुजय विखे पाटलांनी सांगितला तो किस्सा



राहुरी । प्रतिनिधी

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील स्मृती व्याख्यानमालेचे यंदाचे २४वे वर्ष साजरे करण्यात आले. रविवारी, ५ जानेवारी २०२५ रोजी या व्याख्यानमालेच्या पहिल्या दिवशी माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी प्रमुख वक्ते म्हणून सहभाग घेतला. आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत त्यांनी अनेक प्रेरणादायी किस्से सांगितले, ज्यांपैकी काही त्यांनी यापूर्वी कधीच शेअर केले नव्हते. विशेषतः, त्यांनी बूट आणि घड्याळ घालणं का बंद केलं, याचा किस्सा उपस्थितांसमोर मांडला.

सुजय विखे पाटील म्हणाले, मला पूर्वी चांगल्या कपड्यांची, बूट, घड्याळ, गाड्यांची खूप आवड होती. प्रवरा मेडिकल ट्रस्टमध्ये प्रवेश घेतल्यानंतर पहिल्याच दिवशी जझऊमध्ये काम करत असताना एक वयोवृद्ध बाबा आले. टोपी, फाटलेलं धोतर, मळके कपडे आणि तुटलेल्या चपला घालून ते तिथं उभे होते. त्यांचा मुलगा माझ्या युनिटमध्ये ऍडमिट होता, पण ऑपरेशनसाठी त्यांच्याकडे पैसे नव्हते.

त्या बाबांना पाहून माझं मन हेलावलं. त्या क्षणापासून मी बूट आणि घड्याळ घालणं बंद केलं. मला जाणवलं की ज्यांना दोन वेळचं खाणंही परवडत नाही, त्यांच्या वेदनांसमोर माझ्या या वस्तूंचं काहीच महत्त्व नाही. त्या दिवशी माझा मोह, हेवा, आणि गरजांची व्याख्या बदलली. पद्मश्री बाळासाहेब विखे पाटील यांच्यासारखं साधं राहण्याचं महत्त्व त्या अनुभवाने उमगलं. मी नेहमी आजोबांना विचारायचो, 'तुम्ही इतके साधे का राहता?' तेव्हा ते म्हणायचे, 'तुला योग्य वेळी उत्तर मिळेल.' आणि मला ते उत्तर मिळालं. त्या दिवसापासून मी गरिबीच्या वेदना समजून घेतल्या आणि साधेपणाचा स्वीकार केला, असे विखे पाटील यांनी सांगितले.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले, पैसे गरजेचे आहेत, पण त्याला मर्यादा आहेत. पैशांचा हेवा सोडल्याशिवाय मोठं होणं शक्य नाही. जीवनातील खऱ्या गरजांची जाणीव झाल्यावरच यशस्वी जीवनाचा मार्ग सापडतो. सुजय विखे पाटील यांच्या या अनुभवाने विद्यार्थ्यांसह उपस्थितांनाही विचारमग्न केले. त्यांची ही प्रेरणादायी कहाणी साधेपणाची ताकद आणि माणुसकीच्या मूल्यांची महत्त्वपूर्ण शिकवण देऊन गेली.

गरिबीवर मात करत जागतिक यशाची भरारी; डोंगरे यांची प्रेरणादायी गाथा

वर्धा । प्रतिनिधी

खेडेगावातील एका साधारण कुटुंबातून आलेल्या सुनयना डोंगरे यांनी आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली ओळख निर्माण केली आहे. पिढीजात गरिबी आणि कुटुंबाचा मासेमारी व्यवसाय अशा परिस्थितीतून संघर्ष करत, सुनयनाने वर्ध्याचे नाव उज्ज्वल केले आहे. तिची ही प्रेरणादायी कहाणी आजच्या तरुणांसाठी दीपस्तंभ ठरली आहे.



सुनयना डोंगरे यांनी सेलू येथील दीपचंद विद्यालयात शिक्षण घेत असताना क्रीडा क्षेत्रात करिअर करण्याचा निर्णय घेतला. धावण्याच्या स्पर्धांमधून सुरुवात करत, त्यांनी विविध पदके जिंकत आपली वाटचाल सुरू ठेवली. वडिलांचा विश्वास आणि आईचा पाठिंबा यामुळे तिच्या आत्मविश्वासाला बळ मिळाले.२०११ मध्ये सुनयनाची क्रीडा कोट्यातून वर्धा पोलिस दलात निवड झाली. पोलिस सेवेत असतानाही तिने क्रीडा क्षेत्रातील आपले स्वप्न जिवंत ठेवले. मात्र, धावण्याच्या स्पर्धेदरम्यान झालेल्या अपघातामुळे काही काळ तिच्या खेळात खंड पडला. या आव्हानावर मात करत, २०२२ मध्ये शरीरसौष्ठव (बॉडीबिल्डिंग) क्षेत्रात नवी सुरुवात केली.शरीरसौष्ठव प्रकारातील कठोर प्रशिक्षण आणि योग्य आहाराच्या जोरावर सुनयनाने नाशिक येथे झालेल्या महाराष्ट्र पोलिस क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. त्यानंतर लखनौ येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत रजतपदक जिंकत आपली कामगिरी सिद्ध केली.१५ दिवसांपूर्वी दिल्ली पोलीस मुख्यालयातून सुनयनाला वर्ल्ड पोलीस अँड फायर गेम्ससाठी निवडीचा फोन आला. या स्पर्धा इंग्लंडमधील बर्मिंगहॅम येथे २७ जून ते ६ जुलैदरम्यान होणार आहेत. विशेष म्हणजे, भारतातून केवळ सुनयना डोंगरे आणि राजस्थान पोलिसांच्या संजू कुमार यांची निवड झाली आहे.महिला शरीरसौष्ठव हा क्रीडा प्रकार भारतात अजून फारसा लोकप्रिय नाही. तरीही सुनयनाने घेतलेला निर्णय आणि तिची मेहनत कौतुकास्पद आहे. मुंबईतील प्रशिक्षक सुभाष पुजारी यांच्या मार्गदर्शनामुळे हे यश शक्य झाल्याचे ती सांगते.सुनयना डोंगरे यांची ही प्रेरणादायी कहाणी क्रीडा क्षेत्रात वाटचाल करणाऱ्या युवतींसाठी आदर्श ठरत आहे. तिच्या जागतिक स्पर्धेतील यशासाठी वर्ध्यातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे!

सहकार महर्षी नागवडेची पहिली उचल २८०० रुपयांची

श्रीगोंदा । प्रतिनिधी

सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचा सन २०२४ -२५ या चालू गळीत हंगामाचा गाळपास आलेल्या ऊसाचा पहिला हप्ता २८०० रुपये प्र. मे. टनाप्रमाणे येत्या दोन-तीन दिवसात सभासद शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात येणार असल्याची माहिती कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे यांनी दिली.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नागवडे यांनी पुढे म्हटले आहे की, सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखाना ऊस भावामध्ये आतापर्यंत कधीही मागे राहिलेला नाही. सातत्याने चांगला ऊस भाव देऊन सभासद व ऊस उत्पादक शेतकरी यांच्या हिताला प्राधान्य दिलेले आहे. सभासद शेतकऱ्यांना मागील २०२३ -२४ मध्ये दिलेल्या शब्दांनुसार मागील वर्षीची एफ.आर. पी. सह २९०० प्र.मे. टन याप्रमाणे ऊस पेमेंट अदा करून सभासद शेतकऱ्यांची दिवाळी गोड केली आहे. त्यानुसार चालू २०२४ - २५ या गळित हंगामास येणाऱ्या उसाला पहिला हप्ता रुपये २८०० प्र. मे. टनाप्रमाणे देण्यात येणार आहे. नागवडे कारखान्याने सातत्याने दिलेल्या शब्दाप्रमाणे चांगला ऊस दर व इतर पूर्तता केलेली असून सभासद व ऊस उत्पादकांचा विश्वास संपादन केलेला आहे. जिल्ह्यात इतर कारखान्यांच्या तुलनेत नागवडे कारखाना ऊस भावात मागे राहणार नाही असे नागवडे म्हणाले.

तरी सर्व ऊस उत्पादक सभासद शेतकरी यांनी ऊस दराबाबत कुठल्याही प्रकारची शंका मनामध्ये न ठेवता नागवडे सहकारी साखर कारखान्यास जास्तीत जास्त ऊस देऊन गाळपाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता सहकार्य करावे असे आवाहन कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, उपाध्यक्ष बाबासाहेब भोस व संचालक मंडळ सदस्य यांनी केले आहे.

मराठी पत्रकार दिनानिमित्त चौथा स्तंभ पुरस्कार सोहळा उत्साहात पार

वर्धा । प्रतिनिधी

वर्धा श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने मराठी पत्रकार दिनाच्या निमित्ताने स्थानिक धुनिवाले मठ सभागृहात चौथा स्तंभ पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत समाजसेवक आणि पत्रकारांना सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला माजी खासदार रामदास तडस अध्यक्षस्थानी होते, तर उद्घाटन खासदार अमर काळे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून शेतकरी नेते विजय जावंधीया, ज्येष्ठ पत्रकार संजय तिवारी, भाजपाचे नेते सुधीर दिवे, आणि महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रदीप मैत्र उपस्थित होते.



कार्यक्रमादरम्यान ज्येष्ठ पत्रकार संजय तिवारी यांनी पत्रकारांनी राजकीय विषयांपेक्षा गरजू, गरीब, शेतकरी आणि मजुरांच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले. त्यांनी पत्रकारितेवर येणाऱ्या आव्हानांचा उल्लेख करत पत्रकारांना अधिक जागरूक होण्याची गरज असल्याचे सांगितले.

माजी खासदार रामदास तडस यांनी पत्रकार समाजाचा आरसा असल्याचे प्रतिपादन करत शेतकरी व ग्रामीण भागातील समस्यांवर लेखणी चालवावी, असा सल्ला दिला. भाजप नेते सुधीर दिवे यांनी जिल्ह्यात सिंचनाच्या विकासासाठी काम करण्याचे आश्वासन दिले. त्यांनी स्व. वामनराव दिवे ट्रस्टच्या नावाने शेतीविषयक काम करणाऱ्यांना पुरस्कार देण्याची ग्वाही दिली.

यावेळी चंद्रशेखर बोबडे (नागपूर), सुनीता अलोणे, डॉ. अशोक चोपडे, चेतन व्यास, भास्कर कलोडे, संजय धोंगडे (सेलू) यांना चौथा स्तंभ पुरस्कार प्रदान करण्यात आला. पत्रकार आशिष पावडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रवीण धोपडे यांनी केले. सूत्रसंचालन ज्योती भगत यांनी केले, तर आभार प्रदर्शन पत्रकार प्रवीण होणाडे यांनी मानले. या सोहळ्याने वर्ध्यात मराठी पत्रकार दिनाचे औचित्य प्रेरणादायी वातावरणात साजरे करण्यात आले.

वरोऱ्यात ५२ वी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी उत्साहात पार पडली

वरोरा । प्रतिनिधी

पंचायत समिती वरोरा यांच्या विद्यमाने आयोजित ५२ वी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी २६ ते २८ डिसेंबर २०२४ दरम्यान अरविंद विद्यानिकेतन, वरोरा येथे यशस्वीपणे संपन्न झाली. गटशिक्षणाधिकारी ज्ञानेश्वर चहारे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांच्या विज्ञान विषयक ८७ प्रतिकृतींची नोंदणी व मांडणी करण्यात आली. प्राथमिक व माध्यमिक गटांसाठी विविध विषयांवर आधारित या प्रतिकृतींचा समावेश होता.

२७ डिसेंबर रोजी झालेल्या उद्घाटन सोहळ्यास खासदार प्रतिभाताई सुरेश धानोरकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विवेकानंद कॉन्व्हेंटचे अध्यक्ष पुरुषोत्तम वामनराव स्वान होते. गटविकास अधिकारी गजानन मुंडकर, सहाय्यक गटविकास अधिकारी सुरेश शेंडे, गटशिक्षणाधिकारी ज्ञानेश्वर चहारे, अरविंद विद्यानिकेतनचे मुख्याध्यापक गुरुदेव जुमडे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.



डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना आदरांजली वाहून कार्यक्रमाची सुरुवात झाली. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना विज्ञानाच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलन व नवकल्पनांच्या विकासासाठी प्रोत्साहित केले.२८ डिसेंबर रोजी समारोप व बक्षीस वितरण सोहळ्यात डॉ. मृणाल काळे (प्राचार्य, आनंदनिकेतन महाविद्यालय) प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विवेकानंद ज्ञानपीठ कॉन्व्हेंटचे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान होते. विजयी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, शिल्ड व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक गीता चिडे यांनी केले, तर संचालन स्नेहलता ठोंबरे यांनी केले. विज्ञान प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, शिक्षक व विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले. तीन दिवस चाललेल्या या प्रदर्शनाने विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण केली व त्यांच्या सर्जनशीलतेला चालना दिली.

कुमार गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी राज मोरेची महाराष्ट्र संघात निवड

रोहा । प्रतिनिधी

रोठ गावातील युवा खेळाडू कुमार राज ज्ञानेश्वर मोरे याची महाराष्ट्राच्या कुमार गट कबड्डी संघात निवड झाली आहे. ८ जानेवारी २०२५ पासून उत्तराखंड येथे होणाऱ्या ५०व्या राष्ट्रीय कुमार गट अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत तो महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे. या निवडीमुळे राज मोरेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

राज मोरे हा जय बजरंग क्रीडा मंडळाचा मेहनती आणि अष्टपैलू खेळाडू आहे. सांगली येथे झालेल्या राज्य अजिंक्यपद कुमार गट कबड्डी स्पर्धेत रायगडच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला होता. या विजयात संघाचा कर्णधार असलेल्या राज मोरे याचे मोलाचे योगदान ठरले. यापूर्वीही त्याने रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत उत्कृष्ट कामगिरी केली असून, रायगड युवा लीग संघात तो महत्त्वाचा खेळाडू राहिला आहे.कुमार राज मोरेच्या कामगिरीमुळे जय बजरंग क्रीडा मंडळ आणि रोठ गावात आनंदाचे वातावरण आहे. क्रीडा मंडळाचे अध्यक्ष अमर सलागरे यांनी राज मोरेचे अभिनंदन करत त्याला आगामी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.राज मोरेची ही निवड रोठ गावातील युवकांसाठी प्रेरणादायी ठरत असून, त्याच्या राष्ट्रीय स्पर्धेतील यशासाठी परिसरातील नागरिकांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

वृंदावन कॉटन जिनिंगवर कापूस खरेदी करताना लूटमारीच्या संशयावरून शेतकऱ्यांचा आक्रोश

बारा वाजेपासून कापूस खरेदी पाडली बंद: सीसीआयची मान्यता रद्द करण्याची शेतकऱ्यांची मागणी

कापुस विक्री करताना वजनात आढळली तफावत: राष्ट्रीय महामार्गही धरला तीन तास अडवून

गोंडपीपरी (सूरज माडूरवार)

गोंडपिपरी तालुका व लगतचा पोभूर्ना तालुका हा कापूस उत्पादक तालुका म्हणून ओळखल्या जातो. गोंडपिपरी येथील चार कॉटन जिनिंग वरती मोठ्या प्रमाणात गोंडपिपरी तालुक्यातील व परिसरातील नागरिक कापूस विक्रीसाठी आणत असतात. तालुक्यातील चार जिनिग पैकी दोनच जीनिगला सीसीआय खरेदीची मान्यता असल्याने दोनही जिनवर मोठ्या प्रमाणात कापूस विक्रीसाठी तोबा गर्दी असते. अशातच विठ्ठलवाडा येथील वृंदावन जिनिंग वरील सीसीआय खरेदी केंद्रात दि.(६) सोमवारी चक ३४ -इ ३७७३ गाडीत नीलकंठ गिरसावडे यांनी कापूस विक्रीसाठी आणले त्यांना एक क्विंटल साठ किलो तफावत आढळली.सोबतच भिमणी येथील शेतकरी चक ३४-इ ७७४५ या वाहनाने आनंदराव पिंपळशेंडे यांनी कापूस विक्रीसाठी आणला याही शेतकऱ्याला वजनात ५५ किलो तफावत आढळल्याची शंका आल्याने कापसाचे वजन पुन्हा करण्यात आले तरीसुद्धा कापसात तफावतच आढळल्याने मोठ्या प्रमाणात शेतकरी वर्ग एकवटले व आक्रोश निर्माण झाला.तीन तास जिनिंगची खरेदी शेतकऱ्यांनी बंद



पाडली त्यानंतर पोलिसांसमक्ष कापूस पुन्हा मोजण्यात आला तेव्हाही कापसामध्ये ५५ किलो तफावत आढळल्याने शेतकरी आक्रमक भूमिका घेत जीनिग मालकावरती गुन्हा दाखल करा सीसीआयची मान्यता रद्द करा या मागणीला घेऊन चक्क चंद्रपूर आष्टी राष्ट्रीय महामार्ग दुपारी १ वाजता पासून संतप्त शेतकऱ्यांनी चार वाजेपर्यंत तीन तास अडवून धरला.यावेळी पोलीस उपविभागीय अधिकारी दिनकर ठोसरे,पोलीस उपनिरीक्षक मणोहर मोगरे,ठाणेदार रमेश हत्तीगोटे, पोलीस निरीक्षक राजकमल वाघमारे तहसीलदार शुभम बहाकर,नायब तहसीलदार चांदेकर घटनास्थळी पोहोचून परस्थिती हाताळली.चौकशी करून कार्यवाही करण्याची मागणी शेतकऱ्यांनी तहसीलदार ठाणेदार, बाजार समिती सभापती इंद्रपाल धूडसे यांच्याकडे केली.सीसीआय खरेदी मान्यता रद्द न केल्यास दोन दिवसात मोठजण आंदोलन उभारणार असल्याचां इशारा सर्वपक्षीय नेत्यांनी घटनास्थळी शेतकऱ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देत प्रशासनाला दिला. शेतकऱ्यांचा आक्रोश यावेळी पाहायला मिळाला बारा वाजता पासून सायंकाळी पाच वाजेपर्यंत कापूस खरेदी शेतकऱ्यांनी बंद पाडली.

"वैद्यमापन शास्त्र विभागाचे अधिकारी तोंडरे उपनियंत्रक,मोरे निरीक्षक,रवी शिंदे जिनिंग वर घटनास्थळी पोहचून धर्म काटा चौकशी केली असता ५५ किलो तफावत साढळल्याने काटा जप्त करून फॉरेन्सिक मधे पाठवून चौकशी केल्या जाईल आहे सागितले.

"घटनास्थळी रात्री ७ वाजेपर्यंत आक्रोश होता.शेतकरी आज पर्यंत विकलेल्या कापसाची नुकसान भरपाई द्यावी मागणी केली.

दौंड तालुका भारतीय पत्रकार संघातर्फे मतिमंद व अपंग मुलांना खाऊ वाटप

लिंगाळी (दौंड) । प्रतिनिधी

दौंड तालुक्यातील लिंगाळी परिसरातील कोर्टाशेजारी असलेल्या स्व. सुभाष अण्णा कुल मतिमंद व बहुविकलांग मुलांच्या विशेष शाळेत दि. ६ जानेवारी २०२५ रोजी दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर जयंती व पत्रकार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात मतिमंद व अपंग मुलांना खाऊ वाटप करण्यात आले.

दौंड तालुका भारतीय पत्रकार संघाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वरिष्ठ पत्रकार आणि संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र सोनवलकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून लिंगाळीचे सरपंच सुनील जगदाळे आणि वरिष्ठ पत्रकार जयदीप बगाडे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाला संघाचे तालुका अध्यक्ष सुभाष कदम, शहराध्यक्ष विजय जाधव, कार्याध्यक्ष सदाशिव रणदिवे, सचिव सुरेश बागल, अग्निसंकेत साप्ताहिक वृत्तपत्राचे संपादक हरिभाऊ क्षीरसागर, दौंड परिवर्तन साप्ताहिक वृत्तपत्राचे संपादक रमेश चावरिया, लिंगाळी माजी ग्राम सदस्य सदाभाऊ पासलकर, ज्येष्ठ नागरिक दिलीप पासलकर व अन्य मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात शाळेतील विकलांग व मतिमंद मुलांना समोसा, जिलेबी, फरसाण असे खाऊ वाटप करण्यात आले. यामुळे मुलांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी उपस्थित पत्रकारांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले.

लिंगाळीचे सरपंच सुनील जगदाळे यांनी पत्रकारांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत, पत्रकार हे समाजासाठी दिवस-रात्र झटत असतात. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी या मुलांसाठी केलेले कार्य प्रशंसनीय आहे, असे सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघाचे कार्याध्यक्ष राजेंद्र सोनवलकर आणि सचिव सुरेश बागल यांनी विशेष प्रयत्न केले. संघाचे अध्यक्ष सुभाष कदम यांनी सर्व उपस्थितांचे आणि पत्रकार संघाचे आभार मानले.

शाळेतील शिक्षक दिगंबर पवार, गणेश हाके, निरमल्ला हिप्परगी, विक्रम शेलार, वैभव शेलार, संजय बनसोडे, विकास जाधव, मोनिका गायकवाड व अन्य कर्मचाऱ्यांनीही कार्यक्रमासाठी सहकार्य केले. कार्यक्रमाचा समारोप आनंददायी वातावरणात झाला.



खेळणीद्वारे अध्ययन-अध्यापन प्रशिक्षण कार्यशाळेस उत्साहात सुरुवात

धुळे । प्रतिनिधी

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) धुळे यांच्या माध्यमातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत खेळणीद्वारे अध्ययन-अध्यापन प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. दोन दिवसीय या कार्यशाळेचा प्रारंभ ६ जानेवारी २०२५ रोजी करण्यात आला.



सदर कार्यशाळेचे उद्घाटन वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ. जयप्रकाश पाटील यांच्या हस्ते झाले. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या डॉ. मंजुषा क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यशाळेचे प्रास्ताविक वरिष्ठ अधिव्याख्याता व समन्वयक डॉ. रमेश चौधरी यांनी केले. त्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतींचे महत्त्व स्पष्ट केले.

या प्रशिक्षणामध्ये प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना बाहुल्या, पपेट, विविध खेळणी यांसारख्या साधनांचा उपयोग करून घटक कसा समजवायचा, याचे मार्गदर्शन करण्यात येत आहे. खेळणी तयार करण्याचे प्रात्यक्षिक प्रशिक्षणही यामध्ये दिले जात आहे.

कार्यशाळेत प्रशिक्षण देणारे सुलभक म्हणून डॉ. संगीता महाजन (अधिव्याख्याता, डायट जळगाव), राममूर्ती रायसिंग (प्राथमिक शिक्षक, चोपडा), प्रवीण माळी (प्राथमिक शिक्षक, चोपडा), पंकज पाटील (माध्यमिक शिक्षक, चोपडा) यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास डॉ. जयप्रकाश पाटील, डॉ. रमेश चौधरी, चंद्रकांत पवार, मिलिंद पंडित (अधिव्याख्याते, डायट धुळे), शिक्षण विस्तार अधिकारी डॉ. नीता सोनवणे, रत्नप्रभा दंडगव्हाण यांची उपस्थिती होती.

या उपक्रमासाठी प्रतिभा ठाकूर (कुल प्रमुख, शासकीय विद्यानिकेतन धुळे), राहुल पाटील, प्रशांत बोरसे, प्रमोद भोई, वीरेंद्र सूर्यवंशी यांचे सहकार्य लाभले.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या उद्दिष्टांनुसार खेळणीद्वारे अध्ययन-अध्यापन हे विद्यार्थ्यांसाठी शिक्षण प्रक्रियेतील महत्त्वाचे साधन ठरणार असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांच्या हस्ते राजुरा येथे भाजप सदस्यता अभियानाचा शुभारंभ

चंद्रपूर । प्रतिनिधी

संगठन पर्व मोहिमेच्या अंतर्गत भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय सदस्यता अभियान २०२५ चा शुभारंभ ६ जानेवारी २०२५ रोजी राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांच्या हस्ते राजुरा येथील ॲड. यादवराव धोटे महाविद्यालयाच्या प्रांगणात उत्साहात पार पडला.



या अभियानासाठी हंसराज अहीर यांच्या विशेष उपस्थितीत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास माजी आमदार सदर्शन निमकर, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष अरुण मस्की व सतीश धोटे, भाजयुमो जिल्हा महामंत्री राहुल सूर्यवंशी, कामगार आघाडी उपाध्यक्ष महादेव तपासे, भाजयुमोचे माजी तालुकाध्यक्ष सचिन शेंडे, भाजयुमो सास्ती अध्यक्ष अरुण लोहबळे, भाजयुमो तालुका उपाध्यक्ष भुषण जुनघरी यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या प्रसंगी हंसराज अहीर यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी तालुक्याला दिलेले सदस्य नोंदणी अभियानाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत आणि पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी योगदान द्यावे, असे आवाहन केले. तसेच आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका आणि इतर निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाचे संघटन मजबूत करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. या सदस्यता अभियानामध्ये शेकडो नागरिकांनी स्वयंस्फूर्तपणे सहभागी होत भाजपाचे सदस्यत्व स्वीकारले. या उपक्रमास नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला, त्यामुळे कार्यक्रम अधिक यशस्वी ठरला. सदस्यता अभियानाने तालुक्यात भाजपाच्या संघटनेला नवा जोम दिला असून, सर्व स्तरांवर पक्षाच्या वाढीसाठी हा कार्यक्रम महत्त्वाचा ठरणार असल्याचे मत प्रमुख नेत्यांनी व्यक्त केले.

जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सवाचा समारोप

चंद्रपूर । प्रतिनिधी

जिल्ह्यातील शासकीय तथा निमशासकीय बालगृहातील मुलांचा शारीरिक व मानसिक विकास व्हावा तसेच इतर मुलांसोबत स्पर्धा करण्याचा आत्मविश्वास निर्माण व्हावा, यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या चाचा नेहरू बाल महोत्सवाचा समारोप नुकताच करण्यात आला. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दीपक बानाईत यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय चाचा नेहरू बालमहोत्सव २ ते ४ जानेवारी या कालावधीत घेण्यात आला.



समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहदिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर प्रशांत कुळकर्णी तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी, बाल न्याय मंडळाच्या अध्यक्षा तथा पिठासीन अधिकारी सीमा लाडसे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुभाष यादव आदी उपस्थित होते.

यावेळी न्या. प्रशांत कुळकर्णी म्हणाले, स्पर्धांमधूनच यशस्वी व्यक्तिमत्व घडत असते. स्पर्धेला न घाबरता विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घ्यावा. त्यामुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण विकसीत होतात, असे त्यांनी सांगितले. सुमित जोशी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला व भविष्यासाठी शुभेच्छा.

प्रास्ताविकात जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दीपक बानाईत म्हणाले, पोलिस फुटबॉल मैदान येथे रंगलेल्या तीन दिवसीय बाल महोत्सवात कबड्डी, खो-खो, गोळा फेक, धावणे, रिले, कॅरम, बुद्धिबळ, निबंध, वक्तृत्व, वादविवाद, नृत्य, गायन आदी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धांमधील विजेते, नागपूर येथे होणाऱ्या विभागीय स्तरावरील चाचा नेहरू बाल महोत्सव २०२४-२५ स्पर्धेकरीता पात्र ठरले आहेत.कार्यक्रमाचे संचालन जिल्हा प्रकल्प समन्वयक अभिषेक मोहुर्ले यांनी तर आभार जिल्हा परिविक्षा अधिकारी मोरेश्वर झोडे यांनी मानले. कार्यक्रमाला पोलिस उपअधिक्षक निशिकांत रामटेके, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी गडचिरोली प्रकाश भांददकर, बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा क्षमा बासरकर, ॲड. अमृता वाघ, ज्योत्स्ना मोहितकर, वनिता घुमे, ॲड. मनिषा नखाते, भावना देशमुख, ॲड. अमृता वाघ, मोरेश्वर झोडे, हेमंत सवई, दिवाकर महाकाळकर अतिशकुमार चव्हाण, कविता राठोड, अनिल ताणले, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय साखरकर यांच्यासह जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाइल्ड हेल्पलाइन तथा रेल्वे चाईल्ड हेल्पलाईन, सखी वन स्टॉप सेंटर, शक्तिसदन किलबिल दत्तक संस्था, स्वामी विवेकानंद बालगृह राजुरा, स्वामी विवेकानंद बालगृह नागभीड आदी संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

वाहनांवर एचएसआरपी नंबर प्लेट बसविणे आवश्यक

चंद्रपूर । प्रतिनिधी

१ एप्रिल २०१९ पासून उत्पादित होणाऱ्या सर्व नवीन वाहनांना केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ५० नुसार वाहनांस हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (एचएसआरपी) बसविण्याची तरतुद करण्यात आलेली आहे.वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करून होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातुन सर्व वाहनांना एचएसआरपी (HSRP) बसविणे आवश्यक असून सर्वोच्च न्यायालयाने तसे निर्देशही दिलेले आहेत.

याअन्वये चंद्रपूर जिल्हातील सर्व वाहन धारकांना त्यांच्या वाहनांना एचएसआरपी (HSRP) नंबर प्लेट बसविण्याकरिता पुढीलप्रमाणे सुचना जारी करण्यात आली आहे.

चंद्रपूर जिल्ह्याकरिता M/S FTA HSRP SOLUTION PVT LTD ही एजन्सी निश्चित करण्यात आली असून एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्याकरिता हींीः//रहरीरीहींीरहीी.लिो हे पोर्टल निश्चित करण्यात आलेले आहे.

२. वाहनधारकांनी वरील पोर्टल बुकिंग करून त्यांच्या सोईप्रमाणे अपॉईमेंट घेऊन एचएसआरपी नंबर प्लेट बसवून घ्यावी.

३. वाहनधारक चंद्रपूर कार्यालयातील नोंदणीधारक नसला तरी काही कामानिमित्त चंद्रपूर जिल्ह्यात वाहन वापरत असेल तरी देखील सदर वाहनास नंबर प्लेट बसविणे आवश्यक आहे. ४. सदर एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्याकरीता पुढीलप्रमाणे जीएसटी वगळुन शुल्क आकारण्यात येणार आहे. दुचाकी/ट्रॅक्टर करीता ४५० रुपये, तीन चाकी वाहनाकरीता ५०० रुपये आणि इतर सर्व वाहने ७४५ रुपये. वाहनधारकांना त्याच्या वाहनांवर एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यासंदर्भात काही तक्रार असल्यास संबंधित सेवापुरवठा धारकांच्या पोर्टलवर तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय चंद्रपुर येथे तक्रार दाखल करू शकतात. ६. वाहनांवर एचएसआरपी नंबर प्लेट न बसविल्यास वाहनाचे मालकी हस्तांतरण, पत्ता बदल, वित्त योजना चढविणे / उतरविणे/ दुय्यमप्रत/ विमा अद्यावत करणे इत्यादी कामकाज थांबविण्यात येईल, याची नोंद घ्यावी. तसेच एचएसआरपी नंबर प्लेट नसलेली वाहने, बनावट एचएसआरपी नंबर प्लेट असलेली वाहने, आदीवाहनांवर कार्यालयाकडून भविष्यात दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे यांनी कळविले आहे.

धामणसे यांची भाजपा महाड तालुका चिटणीस व कामगार मोर्चा जिल्हा सरचिटणीसपदी निवड

महाड । प्रतिनिधी

महाड तालुक्यातील तरुण तडफदार नेते मनोज धामणसे यांची भारतीय जनता पार्टीच्या महाड तालुका चिटणीसपदी निवड करण्यात आली असून, भाजप कामगार मोर्चा दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीसपदी पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे. तीन वर्षांच्या कालावधीत त्यांनी पक्षासाठी केलेल्या मेहनतीचे चीज म्हणून त्यांना ही जबाबदारी देण्यात आली आहे.राज्याचे भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आली. महाड येथे आयोजित कार्यक्रमात खासदार धैर्यशील पाटील यांच्या हस्ते मनोज धामणसे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी नवनिर्वाचित मनोज धामणसे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमास जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुनकर, जिल्हा उपाध्यक्ष जयवंत दळवी, भाजप महाड तालुका अध्यक्ष निलेश देवगिरकर, भाजप महिला जिल्हाध्यक्ष मंजुषा पाटील, जिल्हा सदस्य संदीप ठोंबरे आदी मान्यवर उपस्थित होते. नव्या जबाबदाऱ्यां बद्दल मनोज धामणसे यांनी आपल्या मनोगतात पक्ष संघटन मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यांनी सांगितले की, भाजपच्या विचारधारांचा प्रसार व प्रचार करत केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचा लाभ तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम प्रामाणिकपणे केले जाईल.धामणसे यांच्या निवडीमुळे तालुक्यातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून त्यांच्या नेतृत्वामुळे पक्ष संघटनेला मोठ्या प्रमाणात बळकटी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



एचआयव्ही सह जगणा-या व अतिजोखीम गटातील समुहाला शासकीय योजनांचा लाभ द्या-सीईओ जॉन्सन


राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमाचा सर्वकष आढावा

चंद्रपूर । प्रतिनिधी

जिल्ह्यात एचआयव्हीसह जगणारे तसेच अतिजोखीम गटातील समुदायाला सर्व शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी अशासकीय संस्थांची मदत घेऊन त्यादिशेने कार्य करावे. तसेच एड्सग्रस्त नागरिकांसाठी शासनाची मोफत बस पास योजना आहे. त्याचा लाभ प्रत्येक एचआयव्हीसह जगणाऱ्या व्यक्तीला मिळण्यासाठी परिवहन महामंडळाला सुचना करण्यात येणार असल्याचे प्रभारी जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले.

जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्षाचा त्रैमासिक आढावा घेतांना ते बोलत होते. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, अधिष्ठाता डॉ . मिलिंद कांबळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. कुलेश चांदेकर, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. ललितकुमार पटले, एस.एम. मेगदेलवार, महानगर पालिकेच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. नयना उत्तरवार, जिल्हा कार्यक्रम अधिकारी सुमंत पानगंटीवार, एआरटी वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. दिलीप मडावी, डॉ. श्रीकांत जोशी, जिल्हा आयसीटीसी पर्यवेक्षक निरंजन मंगरुळकर, नसीमा शेख अनवर, देवेंद्र लांजे उपस्थित होते.

जिल्ह्यातील एचआयव्ही बाधितांसाठी विविध आरोग्य योजना सुरू आहेत. या योजना रुग्णांपर्यंत पोहोचविण्याच्या सूचना विवेक जॉन्सन यांनी दिल्या. राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमाची माहिती सादर करतांना जिल्हा कार्यक्रम अधिकारी सुमंत पानगंटीवार यांनी जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्रापासून ते शासकीय वैद्यकीय महाविद्यालयापर्यंत एचआयव्ही समुपदेशन व चाचणी सुविधा मोफत पुरविण्यात येत असल्याची माहिती दिली. गतवर्षी २०२३-२४ मध्ये



जिल्हयात सामान्य १ लक्ष ९१५ एचआयव्ही चाचण्या झाल्या. त्यामध्ये २९७ सामान्य संक्रमित आढळले व त्यांना उपचारावर घेण्यात आले. तसेच ४६ हजार ९९६ गरोदर मातांची एचआयव्ही चाचणी झाली. त्यात ३२ माता संक्रमित आढळल्या. एप्रिल २०२४ ते नोव्हेंबर २०२४ पर्यंत ७१ हजार ३७६ सामान्य एचआयव्ही तपासण्या करण्यात आल्या. त्यात सामान्य संक्रमित २१२ आढळले. तसेच २५ हजार ४६७ गरोदर माता यांची एचआयव्ही तपासणी केली त्यात ३३ माता संक्रमित आढळल्या. अतिजोखीम गटात असणाऱ्या टीजी, एमएसएम, एफएसडब्ल्यु यांना राशनकार्ड, आधारकार्ड, तसेच संजय गांधी निराधार योजनेचा पाठपुरावा व इतर शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हा समुदाय संसाधन समूह (ऊ-उठऋ) स्थापन करण्यात आले आहे. शासकीय योजनासंदर्भात येणाऱ्या कागदपत्राच्या अडचणी बाबत यावेळी चर्चा करून त्यावर उपाय काढण्याच्या सुचनाही बैठकीत देण्यात आल्या.बैठकीला संबोधन ट्रस्टचे राज काचोळे, संकल्प बहुउद्देशीय ग्राम विकास संस्था, लिंक वर्कर प्रकल्पाचे रोशन आकुलवार, मायग्रट प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापक देवेंद्र पिंपळकर, ट्रकर्स प्रकल्प नोबल शिक्षण संस्थेचे समुपदेशक मयूर जवादे, मायग्रंट प्रकल्प नोबल शिक्षण संस्थेचे समुपदेशक प्रवीण नायर, विहान प्रकल्पाच्या संगिता देवाळकर, वन स्टॉप सेंटरचे समन्वयक विद्या धोबे आदी स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

फोटोग्राफर्ससाठी कार्यशाळेचे आयोजन, कुशाल सोनी यांचे मार्गदर्शन





चंद्रपूर । प्रतिनिधी

चंद्रपूर : बदलत्या युगात टिकून राहण्यासाठी आणि नवनवीन कौशल्ये आत्मसात करण्यासाठी फोटोग्राफी क्षेत्रातील तंत्रज्ञान व कौशल्यवाढीच्या दृष्टीने टी.डी.यू.सी. फोटोग्राफर संघटनेतर्फे चंद्रपूर येथे एका विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. नवीन वर्षाच्या निमित्ताने आयोजित या कार्यशाळेत रायपूर येथील प्रसिद्ध फोटोग्राफर कुशाल सोनी यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेसाठी चंद्रपूरसह यवतमाळ, गडचिरोली, आदिलाबाद, मंचेरियाल आणि अन्य जिल्ह्यांतील फोटोग्राफर बांधवांनी सहभाग घेतला. कुशाल सोनी यांच्या मार्गदर्शनामुळे उपस्थितांनी आपले कौशल्य विकसित करण्यासह तांत्रिक ज्ञानात भर घालण्याचा प्रयत्न केला.

कार्यशाळेचे प्रायोजक नागपूर येथील प्रख्यात राकेश अल्बमचे मालक राकेश मस्के होते. त्यांनी या कार्यशाळेत अल्बमच्या विविध प्रकारांचे प्रदर्शन व आकर्षक ऑफर्स सादर केल्या. तसेच सह-प्रायोजक यश कॉम्प्युटर्सचे मालक दिगंबर चौधरी यांनी गरजू विद्यार्थ्यांसाठी एम.के.सी.एल योजनांबाबत माहिती दिली.कार्यशाळेच्या शेवटी सोनालिका कलर लॅबचे मालक सुनील यांनी पाच लकी कूपन विजेत्यांना पुरस्कार प्रदान केले. याचवेळी चंद्रपूरमध्ये अल्बम डिझाईन क्षेत्रात दीर्घकाळ कार्यरत संपोषभाऊ जोंधले यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यशाळेच्या समारोप कार्यक्रमात हद्द २ - एक अनहोनी घटना या चित्रपटाचा प्रोमो रिलीज करण्यात आला. या चित्रपटाचे निर्माते सुदेश भालेकर असून, दिग्दर्शन देवा बुरडकर व प्रीतम खोब्रागडे यांनी केले आहे.कार्यशाळेचे सूत्रसंचालन अमूल कोत्रिवार यांनी केले. या उपक्रमाच्या आयोजनासाठी प्रीतम खोब्रागडे, गणेश साळवे, देवा बुरडकर, रमेश तांडी, गंगा भेंडारकर, मंगेश घडीवार, वैभव कुळमेथे यांचे विशेष सहकार्य लाभले.

या कार्यशाळेने फोटोग्राफीच्या क्षेत्रातील नव्या संधी आणि कौशल्यविकासासाठी मार्गदर्शन मिळाल्याचे सहभागी फोटोग्राफर्सनी सांगितले. अशा कार्यशाळा भविष्यातही आयोजित होण्यासाठी सर्वांनी उत्साह व्यक्त केला.

बिरवाडी क्रिकेट असोसिएशनकडून भव्य क्रिकेट सामन्यांचे यशस्वी आयोजन

आझाद वरंध संघ प्रथम, राजेवाडी संघ द्वितीय स्थानावर

महाड । प्रतिनिधी

महाड तालुक्यातील बिरवाडी क्रिकेट असोसिएशनच्या वतीने ३, ४ व ५ जानेवारी २०२५ रोजी भव्य क्रिकेट सामन्यांचे आयोजन एम. एम. ए. ग्राउंड, काळीज बिरवाडी येथे करण्यात आले. या स्पर्धेसाठी भव्य पारितोषिके आणि चषके ठेवण्यात आली होती.



या क्रिकेट स्पर्धेत एकूण ३८ संघांनी सहभाग घेतला. त्यामध्ये आझाद वरंध संघाने प्रथम क्रमांक पटकावला, तर राजेवाडी संघाने द्वितीय स्थान मिळवले. मस्त ग्रुप कुंभारवाडा संघ तृतीय, ब्लू स्टार बिरवाडी चतुर्थ, तर भीवघर संघाने पाचवे स्थान मिळवले.

ग्रामीण भागातील खेळाडूंना चांगल्या स्पर्धा खेळण्याची संधी मिळावी, तसेच सर्व जाती-धर्मांचे लोक एकत्र येऊन राष्ट्रीय एकात्मता मजबूत व्हावी, हा या सामन्यांच्या आयोजनामागील उद्देश होता. या उपक्रमामुळे स्थानिक खेळाडूंना राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेसाठी प्रोत्साहन मिळेल, अशी भावना आयोजकांनी व्यक्त केली.

एम. एम. ए. ग्राउंडवर या सामन्यांना पाहण्यासाठी हजारो क्रिकेट प्रेमींनी उपस्थिती दर्शवली. यावेळी खरवली-काळीज ग्रामपंचायतीचे सरपंच चैतन्य उर्फ बाबू महामुनकर, महाड तालुका शिवसेना संपर्कप्रमुख अण्णा महामुनकर, इम्तियाज माटवणकर यांच्यासह अनेक मान्यवरांनी सामन्यांचा आनंद घेतला.

बिरवाडी क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष प्रशांत महामुनकर, बंटी बिरवाडकर, प्रशांत तरे आणि तेजस महामुनकर यांनी या सामन्यांचे उत्कृष्ट आयोजन केले. त्यांच्या मेहनतीमुळे या स्पर्धेचे यशस्वी आयोजन शक्य झाले.

या स्पर्धेमुळे स्थानिक खेळाडूंना मोठ्या स्पर्धांसाठी प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. तसेच पुढील काळात अशा प्रकारच्या स्पर्धा नियमितपणे आयोजित करून ग्रामीण खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचा निर्धार आयोजकांनी केला.

ग्रा.दाभलोन व ग्रा.ढाढरी येथे मोफत बालनेत्र तपासणी शिबीर संपन्न

जव्हार । प्रतिनिधी

प्रोजेक्ट प्रकाश चॅरिटेबल ट्रस्ट, दिल्ली आणि एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायत दाभलोन आणि ढाढरी येथे मोफत बालनेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरात शंभरहून अधिक मुलांची नेत्र तपासणी करण्यात आली.

शिबीरात ऑप्टोमेट्रिस्ट असद फुजेल आणि व्हिजन टेक्निशियन राम सानप यांनी मुलांच्या डोळ्यांतील विकार, मोतीबिंदू, तिरळेपणा यांची तपासणी करून मोफत समुपदेशन केले. मुलांमध्ये आढळणाऱ्या नेत्रविकारांबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.



प्रोजेक्ट प्रकाशचे कार्यक्रम प्रमुख शशिकांत भिसे यांनी भविष्यात आदिवासी मुलांसाठी मोफत बालनेत्र तपासणी शिबीरांचे आयोजन करण्याचे आश्वासन दिले. तसेच, मोतीबिंदू आढळणाऱ्या मुलांचे मोफत ऑपरेशन आणि गरजू मुलांना मोफत चष्म्यांचे वाटप केले जाईल, असे त्यांनी सांगितले. या शिबीरासाठी आदिवासी अस्मिता प्रतिष्ठान संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व दाभलोन ग्रामपंचायतीचे सरपंच सुदाम उंबरसाडा आणि ढाढरी ग्रामपंचायतीचे सरपंच बबन अकणे यांनी सहकार्य केले. अशा शिबीरांची गरज असून, भविष्यातही आदिवासी अस्मिता प्रतिष्ठानच्या माध्यमातून अशा उपक्रमांचे नियोजन करण्यात येईल, असे संस्थेचे अध्यक्ष यांनी सांगितले.मोफत बालनेत्र तपासणीसारख्या उपक्रमांमुळे आदिवासी भागातील मुलांना योग्य उपचार मिळण्यास मदत होत आहे. या उपक्रमांचे स्थानिक पातळीवर स्वागत होत असून पुढील शिबीरांसाठीही नागरिकांमध्ये उत्सुकता आहे.

१२ जानेवारीला कोकणची लोककला 'नमन' सादर होणार

मुंबई । प्रतिनिधी

साई माऊली कलामंच (मुंबई) यांच्या वतीने कोकणची लोककला 'नमन' सादर करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम रविवार, १२ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ३.३० वाजता मराठी साहित्य संघ मंदिर, गिरगाव, चर्नी रोड येथे होणार आहे.

'नमन' या कोकणातील पारंपरिक लोककलेत श्री गणेश आराधना, गण-गवळण, राधा-कृष्णाची प्रेमलीला यांसारखे विविध प्रकार तसेच सामाजिक संदेश देणारे हृदयस्पर्शी लोकनाट्य सादर होईल. कार्यक्रमाचे लेखन, सूत्रसंचालन आणि गीतरचना सचिन ठोंबरे यांनी केले असून दिग्दर्शन रमेश ठोंबरे यांचे आहे. कार्यक्रमासाठी संदेश पालकर (गायक), प्रथमी मोहिते (गायिका), समीर मास्कर (ढोलकी), संदेश आंबेकर (ऑर्गन), अजय धनावडे (बँजो), कुंदन साळवी (ऑक्टोपॅड), तसेच वैष्णवी घागरे, गौतमी वालम, दर्शना बागकर, दिव्या गोवळकर, अक्षता मोरे, हिरंण्या आंबेकर व इतर कलाकार सहभागी होणार आहेत. सर्व रसिकांनी सहकुटुंब उपस्थित राहून कोकणच्या लोककलेचा आनंद घ्यावा, असे आवाहन साई माऊली कलामंचतर्फे करण्यात आले आहे. तिकीट व अधिक माहितीसाठी नरेश मोरे (७०३९४९८६९९), सचिन ठोंबरे (९९२०७८२३८१), रमेश ठोंबरे (७३०४२३६१९६) यांच्याशी संपर्क साधावा.

गंगाखेड येथे पत्रकार दिना निमित्त पत्रकारांचा सत्कार

गंगाखेड । प्रतिनिधी

पत्रकार दिनानिमित्त गंगाखेड शहरातील शासकीय विश्रामगृह येथे आज, ६ जानेवारी रोजी पत्रकारांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, पोलिस उपविभागीय अधिकारी दिलीप टिपरसे, पोलिस निरीक्षक दीपककुमार वाघमारे आणि पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष दगडु शेठ सोमाणी आदी मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी पत्रकारितेच्या महत्त्वावर प्रकाश टाकत, पत्रकार हे समाजाच्या चौथ्या स्तंभाचे कार्य प्रामाणिकपणे पार पाडत असल्याचे गौरवोद्गार काढले. उपस्थित मान्यवरांनी पत्रकारांना शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचा सन्मान केला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्थानिक पत्रकार संघाने विशेष परिश्रम घेतले.

तहसीलदारांच्या प्रयत्नाने जेऊर कुंभारी गावात बांधावरच न्यायनिवाडा

दोन पिढ्यांपासून चालत आलेला वाद मिटल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधान

अहिल्यानगर । प्रतिनिधी

कोपरगावचे तहसीलदार महेश सावंत यांच्या प्रयत्नांमुळे कोपरगाव तालुक्यात मौ.जेऊर कुंभारी गावातील दोन वेळा न्यायालयाचा निकाल लागूनही किरकोळ गैरसमजांमुळे बंद असलेला शेतरस्ता तहसीलदारांनी बांधावरच न्यायनिवाडा करून खुला केल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

मौ.जेऊर कुंभारी गावातील १० फूट रुंदीचा व ६०० मिटर लांबीचा रस्ता सख्ख्या चुलत्या - पुतण्यातील वादात अडकला होता. त्यामुळे दोघांमध्ये कटुता निर्माण झाली होती. हे प्रकरण दोन पिढ्यापासून सुरू होते. दोघी बाजूंनी न्यायालयाच्या पायऱ्याही झिजविल्या. शासकीय कार्यालयाचे हेलपाटेही झाले. दोघांच्या वेळ आणि पैसा खर्च झाला, दोनदा न्यायालयात निर्णयही झाला. असे असतांनादेखील वाद संपुष्टात येत नव्हता. अशावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न लवकर मार्गी लावण्याचे निर्देश दिल्याने त्याचाच एक भाग म्हणून तहसीलदार सावंत यांनी सुरू केलेल्या बांधावर न्यायनिवाडा करण्याच्या मोहिमेंतर्गत या प्रकरणाकडे लक्ष घातले.त्यांनी शेतावर जावून दोघी पक्षांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. किरकोळ गैरसमजातून दोघांचे नुकसान होत असल्याचे त्यांना पटवून दिले. संवेदनशील पद्धतीने सामंजस्य दाखविण्याचे दोघांना आवाहनदेखील केले. एकाने मोठेपणा दाखविणे आणि दुसऱ्याने माघार घेणे यात दोघांचे मोठेपण असल्याचे सावंत आणि इतर उपस्थित पंचांनी त्यांना पटवून दिल्याने दोन्ही २ वेळा न्यायालयाचे निर्णय होवूनही न मिटलेला आपापसांतील शेतरस्त्याचा वाद मोक्यावरच मिटवून घेण्यासाठी तयार झाले आणि आपापसात तडजोड करीत वाद मिटवला. हा शेतरस्ता आपपसांतील सहमतीने प्रतिवादीने (चुलत्याने) वादीला (पुतण्याला) मोकळा करून दिला. वादापोटी एकमेकांवर धावून जाणारे चुलते - पुतण्यांनी आपल्या भावनांना वाट करून देत एकमेकांना मिठीदेखील मारली आणि हा प्रसंग पाहून ग्रामस्थांना देखील आनंद झाला. शेतकऱ्यांचे बरेचसे रस्त्यांचे वाद-विवाद हे किरकोळ गैरसमज किंवा थोडासा मीपणा बाजूला ठेवला तर जागेवरच मिटू शकतात. शेतकऱ्यांना कोर्टकचेरी , पोलीस केसेस करणे परवडत नाही. यामुळे वेळेचा व पैशांचा अपव्यय तर होतोच सोबत शेतीकडेही दुर्लक्ष होते , वैमनस्यात वाढ होत जातो आणि शेतकरी हा नेहमी तणावपूर्ण मानसिकतेत राहतो. दोघांनाही जिवापाड जपलेल्या शेतीची रस्त्याच्या भांडणापाई व कोर्ट केसेस लढवतां लढवतां ती



जमीनच विक्री करण्याचीही कधीकधी वेळ येते. परंतु दोघांनीही मनाचा थोडासा मोठेपणा दर्शवला व मीपणा थोडावेळ दूर ठेवला तर मागच्या दोन पिढ्यांपासून चालत आलेला वाद पुढच्या पिढ्यांना करावा लागणार नाही हे तहसीलदार कोपरगाव महेश सावंत व इतर उपस्थित पंचांनी समजावून सांगितल्यावर सुरुवातीला एकमेकांवर धावून जाणारे शेतकरी जे भावनिक होतं फिल्मी स्टाईलमध्ये एकमेकांना भेटले . सख्खे चुलते पुतणे यानिमित्ताने आपापसांतील गैरसमज व भांडणतंटा दूर करून एकत्र आल्याचा आनंद सर्वच उपस्थितांना झाला . वादी व प्रतिवादी तसेच त्यांचे नातेवाईक व उपस्थित प्रतिष्ठित पंच यांनी प्रशासनाचे आभार मानले.अशाच प्रकारचा चुलते - पुतणे यांच्यातील आणखी एक शेतरस्ता आडवल्याबाबतचा वाद कोपरगाव तालुक्यातील मौ. शाहजापूर येथेही सुरू होता. हाणामारी आणि भांडणे होवून पोलीस स्टेशनला अनेकदा तक्रारी होवून गुन्हेही दाखल झाले होते. परंतू याच पद्धतीने शेतकऱ्यांना समजावून सांगत हा वाददेखील बांधावरच मिटविण्यात आला. प्रशासनाने संवेदनशीलतेने काम केल्यास नागरिकांचे प्रश्न सहजपणे सोडवून त्यांना दिलासा देता येतो हे कोपरगावच्या महसूल प्रशासनाने शेतकऱ्यांच्या बांधावर त्यांचे प्रश्न सोडूवन दाखवून दिले आहे. महेश सावंत, तहसीलदार, कोपरगाव- शेतकऱ्यांचे बरेचसे रस्त्यांचे वाद - विवाद हे किरकोळ गैरसमज दूर सारून आणि सामंजस्याने जागेवरच मिटू शकतात . शेतकऱ्यांना कोर्टकचेरी , पोलीस केसेस करणे परवडत नाही. यामुळे वेळेचा व पैशांचा अपव्यय तर होतोच सोबत शेतीकडेही दुर्लक्ष होते, वैमनस्यात वाढते आणि त्यामुळे शेतकरी हा नेहमी तणावपूर्ण मानसिकतेत राहतो. बऱ्याचदा अशा प्रकरणात जमीनच विक्री करण्याचीही कधीकधी वेळ येते. पुढच्या पिढीलाही यामुळे त्रास सहन करावा लागतो. म्हणूनच अशी प्रकरणे संवादाद्वारे सोडविण्यासाठी जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ आणि अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल प्रशासनाने बांधावर जावून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याची मोहीम सुरू केली आहे. शेतकऱ्यांच्या सहकार्यामुळे या मोहिमेला चांगले यश मिळते आहे.